परस्परं भावयन्तः

म प्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ९३ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ मार्च २०१३

वेबसाईट : www.maratheprastishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)



## संपादकीय

प्रिय कुलबांधवांना आणि कुलभगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार

मागच्या डिसेंबरच्या अंकात 'हितगुज' सुरू ठेवण्यात आपल्याला स्वारस्य आहे का नाही, असल्यास २०००/- रु. वर्गणी पाठवा असे आवाहन केले होते त्याला अनुसररून , काही कुलबांधवांनी वर्गणी आणि देणगी पाठवून अनुकूल प्रतिसाद दिला त्याबद्दल त्यांना धन्यवाद देते.

'हितगुज'ला आर्थिक मदत भरपूर मिळाली तर 'हितगुज' ची वाटचाल यशस्वीपणे आपण पुढे नेऊ शकतो असा विश्वास मला वाटतो. 'हितगुज'चे अस्तित्व टिकविण्यासाठी ते कायम चालू राहील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या कुलबांधवांनी 'हितगुज'ची वर्गणी भरली आहे, देणगी किंवा जाहिरात दिली आहे त्या सर्व कुलबांधव-कुलभगिनींची नावे या अंकात छापली आहेत. चुकून अनवधनाने एखादे नाव राहिले असल्यास क्षमा करावी.ज्या कुलबांधवांची वर्गणी भरायची राहिली आहे त्यांनीही न विसरता लवकर वर्गणी भरावी ही विनंती असो,

या अंकात, श्रीमती कुमुद डोके (मराठे) चित्रकार यांचा 'आमचे अण्णा उर्फ वामन आत्माराम मराठे हा वडिलांवरचा भावपूर्ण लेख आहे. व्यक्तिचित्रण अत्यंत संवेदनाक्षम, तरल, हळव्या मनाने मुलीने केले आहे ते मनाला भावते. मराठे प्रतिष्ठानचे ज्येष्ठ वयोवृद्ध वि. के. मराठे यांच्या आग्रहाच्या सांगण्यावरून कुमुदताई लिहित्या झाल्या आणि त्यामुळे वडिलांच्या आठवणींचा बांध फुटला आणि एका हृदयस्पर्शी लेखाची निर्मिती झाली.

'रंग माझा काळा' या वैशिष्ट्यपूर्ण लेखात जयश्री मराठे यांनी काळ्या रंगाचे महत्त्व समर्पक उदाहरणे देऊन सांगितले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांना शिक्षा झाली ती अंदमानच्या काळ्या पाण्यावर, कादंबरीचे नाव ही 'काळे पाणी'

संत ज्ञानेश्वरांची 'रात्र काळी,घागर काळी, यमुना जळे ही काळी हो माय...
गुंथ काळी, बिलवर काळी.. ऐकली पाण्याला नव जाय साजणी हो...सवे साजन
मूर्ति सावळी'
ही गवळण गुणगुणली जाते.

कै. मधुकर तोरडमल तथा मामांच्या नाटकाचे नावही 'काळे बेट,लाल बत्ती'. बहिणाबाई चौधरींची 'काळ्या मातीत....' ही कविता आठवते. अनेक म्हणी, वाक्यप्रचारांतही काळा रंग डोकावतो. उदा. 'गोरी गोरीपान तिच्या घरामध्ये घाण, काळी काळी कुळकुळीत तिचे घर लखलखीत' किंवा 'कोळसा कितीही उगाळला तरी काळाच.'

हिंदी गाण्यातही काळा रंग मुबलक वावरतो. 'हम काले हो तो क्या हुआ दिलवाले हैं', किंवा 'काले कौओ से डरियो, मैं मैके चली जाऊंगी तुम देखते रहिओ' असे म्हणत माहेरी जाण्याची धमकी देते.

काळे आडनावाचे अनेक लोक भारतात आणि भारताबाहेर राहतात. असा हा काळा रंग समाजाने सर्वोच्च रंग मानला पाहिजे असे लेखिकेचे मत आहे.

मानसन्मान, सहवेदना, कविता असा वाचनीय मजकूर या अंकात आहे.

होळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(पृ.१२०)
८/१३ सहकार नगर, मुंबई, ४०००३१, फोन ०२२-२४१५०८८९

२८, फेब्रुवारी २०१३

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा ३४ वा वर्धापन दिन वृत्त

* * *

शनिवार २६ जानेवारी २०१३ रोजी वेदशास्त्रोत्तेजक या सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सौ. प्राची मराठे हीने 'जय शारदे' या गाण्याने कार्यक्रमास सुरुवात झाली. हिने खूपच छान सुरेल आवाजात गाऊन कार्यक्रमास प्रसन्न वातावरणाने सुरुवात केली. ही सारेगमप या कार्यक्रमात फायनला पोहोचली आहे. तिचा सौ. नीलांबरी मराठे यांनी श्रीफल देऊन सत्कार केला.

यानंतर सौ. सुमेधा मराठे, श्री. श्रीनिवास मराठे, श्री. खांबेटे हे स्टेजवर स्थानापन्न झाले. श्री. श्रीनिवास मराठे यांनी श्री. सी. गो. खांबेटे व सौ. सुमेधा मराठे यांचा श्रीफल देऊन सत्कार केला. यानंतर सौ. मंजिरी मराठे यांनी त्यांच्या सासूबाई श्रीमती मंगला मराठे यांचे (शाब्बास सूनबाई) मनोगत वाचून दाखविले.

यानंतर श्री. खांबेटे यांनी यापुढे आपले हितगुज हे मासिक चालू राहावे, यासाठी येणाऱ्या अडचणी व मासिकासाठी येणाऱ्या देणग्या व जाहिराती यातून 'हितगुज'चा खर्च भागत नाही. यासाठी सर्वांनी रु.२०००/- तहहयात वर्गणी द्यावी अशी विनंती केली.

सौ. सुमेधाताईंनी 'हितगुज' अंक असाच पुढे चालू राहावा म्हणून सर्व सभासदांनी यावर विचार करून सहकार्य करावे अशी कळकळीची विनंती सभासदांना केली.

चि. सिद्धार्थ अभय जाईल याला ८८% गुण मिळाले. चि. अथर्व विजय मराठे याला ८२.१८% गुण मिळाले. या दोघांचे श्री. खांबेटे यांचे हस्ते बक्षीस व प्रशस्तीपत्रक देऊन त्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. चि.मिहीर प्रमोद खांबेटे हा एमफार्मचा विद्यार्थी अनुपस्थित होता. यानंतर कल्पक संस्थेद्वारे श्री. महेश पाटणकर व सौ. वंदना जोगळेकर आणि त्यांचे सहकारी यांनी 'शोध कवितेचा' हा जुन्या मराठी कवितांचा सुंदर आविष्कार सादर केला. कार्यक्रम अतिशय सुंदर प्रकारे सादर केल्यामुळे सर्वांना लहानपणीची शाळा व त्याचबरोबर शाळेत सर्वांनी मिळून म्हटलेल्या कविता यात सर्वजण थोडावेळ लहानपणीच्या जगात रममाण झाले. 'पडू आजारी मौज ही वाटेभारी' गुणगुणत या कार्यक्रमात सामील झाले.

या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कस्तुरी मराठे हिने केले.

शेवटी डीझास्टर मॅनेजमेंट या विषयावर सौ. सरोजिनी व श्री. अनुरूप मराठे यांनी आध्यात्मावर आधारित दृकश्राव्य कार्यक्रम सादर केला.

गरम बटाटेवडा आणि शिरा तसेच चहा-कॉफी असा हा स्वादिष्ट अल्पोपहार होता.

**- प्रेषक : सौ.माधवी जाईल (पृ.७५३)**

आदित्य नाकोडा के/एस गौरीशंकर, जुना जकात नाका, सिंहगड रोड, पुणे ४११०३०,फोन : ०२०-२४२५१९

Marathe Pratishthan

# ‘आमचे अण्णा’ ऊर्फ वामन आत्माराम मराठे (पृ.३६६)

- कुमुद डोके, ठाणे (ज्येष्ठ कन्या - वा.आ.मराठे, पुणे)

३ मार्च २००५ हा वामन आत्माराम मराठे कुटुंबियांच्या ८५ वर्षांच्या कालखंडाचा जणू पर्व समाप्तीचाच दिवस. संध्याकाळी ६ वाजता लाडका नातू (बगड्या) अर्चिस याचे हातून नारळपाणी पिऊन अण्णांचा परलोक प्रवास सुरू झाला. (विनोदाने म्हणावेसे वाटते तोही हवाई सायकल वरूनच की काय कोण जाणे?) एकूणच अण्णा आपले आयुष्य मोठ्या शिस्तीत आणि आखीव, रेखीव चौकटीत जगले एवढे मात्र खास. मी संध्याकाळी ठाणे येथील गजानन महाराज मठासमोर दर्शनाच्या रांगेत उभी असतानाच माझ्या सुनेचा सौ. संचिताचा अण्णा गेल्याचा फोन आला. त्याक्षणी माझ्या अंगावर जणू काहीतरी कोसळते आहे असा भास झाला. पुणेरी मंडळींचा खोळंबा नको म्हणून इच्छा असूनही अंत्यदर्शनास जाण्याचे रद्द केले. या प्रसंगीही मला खेदाने एक गोष्ट कबूल करावीशी वाटते, की ज्याला भेटायचं तो गेला त्याला तुम्ही आलात काय गेलात काय फरक पडतो. वेळ गाठण्याचा खटाटोप का करायचा सारे अगम्य. केवळ रूढी म्हणून की उरलेल्यांना आधार बरे वाटावे म्हणून उलगडत नााही हेच खरे असो. सर्वांच्या सेवेचा त्याग करून अण्णांचा आत्मा चिरशांतीसाठी अलगद मार्गस्थ (स्वर्गस्थ) झाला.

ॐ भूर्भुवस्व: तस्य वितुर्वरेण्यम। या मंत्राचा खड्या आवाजात उद्‌घोष करीत सकाळी ८ वाजता अण्णांची पूजा चालू होई. दैनिक सकाळचे वाचन दर्शन झाल्याखेरीज ते देवाकडे बघत नसत. अंगणातील चुलीवर सर्वांसाठी गरम पाणी अंघोळीस तापवून देणे जणू नेम होता. प्रत्यक्ष पूजा सुरू झाल्यावर सौभ्यागवतींना असंख्य सूचना देणे हा त्या पूजेतलाच एक भाग असावा. स्टोव्ह तापून वाया जातोय, पाण्याचा पिंपाचा नळ बरीक कमी करा, बगड्याला दूध, लोणी दिलेत की नाही, भाजीची राखुंडी झाली वाटतं लक्ष कुठे आहे तुमचे वगैरे वगैरे. पाणीच काय सर्वच गोष्टी काटकसरीने वापरणे त्यांच्या अंगवळणीच पडले होते. १९५० ते १९७० मला समजायला लागे तो यात कोणताही खंड नाही.

३७३ शनिवार पेठ, पुणे, खिंवसरा मारवाडी यांची चाळ येथील दोन खोल्यांच्या घरात, थिटे, पांगारकर, नार्वेकर, जोशी, पाटील अशा बहुरंगी शेजाऱ्यांच्या सहवासात आमचे बालपण बहरले, मोठ्या आनंदात, एकोप्यात गेले. १९६१ च्या पानशेत धरणफुटीने आलेल्या पुराने मात्र याला गालबोट लागले. दहा वाजता चाकरमानी ऑफिसला पोहोचली. अकरा वाजता आमच्या शाळा भरल्या. लगेचच शाळा सोडण्यात आली व ताबडतोब घर गाठा सांगण्यात आले. पायीच आले. स्वयंसेवकांनी आम्हाला ओरडून घरी पळायला लावले. पाण्याच्या प्रचंड माऱ्यामुळे घराची सामाईक भिंत कोसळून स्वयंपाकघराची बेगमीचे धान्य भरलेली खोलीच वाहून गेली. प्रत्येकजण हातात मिळेल ते सामान घेऊन चढाच्या दिशेला धावू लागले.

पूरग्रस्तांसाठी सरकारी कोट्यातील जमीन मिळवून देण्यास मा. मोहन धारिया, श्री. बी. डी. किल्लेदार, श्री. नरूभाऊ लिमये सर्व पक्षीय नेत्यांनी पुढाकार घेतला. पर्वतीपुढे लक्ष्मीनगर, सहकार नगर १, २, येथे सोसायटी स्थापून घरे बांधणी झाली. दिलासा मिळाला. सिमला ऑफिस कॉलनी या नावाने रजि. झालेल्या जागेत ‘तृप्ती’ नावाच्या बंगल्यात १९७० साली वा. आंच्या कुटुंबाचा गृहप्रवेश झाला. याच सिमला ऑफिस म्हणजे वेधशाळा, शिवाजीनगर, पुणे अण्णांच्या ऑफीसचा हवामान दिन एखाद्या सणाप्रमाणे साजरा होई. सहकुटुंब सर्व कर्मचारी ऑफीस आवारात जमत. खूप मोठे रंगीत फुगे, विविध रंगी भरघोस फुले, चॉकलेट मिठाईची लयलूट असे. रोषणाई, बँडचा तालबद्ध आवाज दिवस संपूच नये असे वाटे. ब्रिटिश पद्धतीची इमारत असल्याने टॉवरवरील घड्याळ वेळेची आठवण देई. त्या काळात ऑफीसमध्ये कार्यरत महिला कर्मचारी माझा कुतूहलचा विषय होता. नऊवारी साडी, अंबाडा, गजरा, सोनेरी काड्यांचा चष्मा लावलेल्या प्रधानबाईंविषयी मला आदरयुक्त आकर्षण वाटे. आमच्या भोवताली सर्व स्त्रिया गृहकृत्यदक्ष ऑफीस वगैरेचे नावच नाही. कदाचित त्यामुळेही असेल एकमेव कर्मचारी महिलेचे मला कौतुक व आश्चर्यही वाटे.

बालपणी मी व माझा धाकटा भाऊ रविंद्र दोघांनाही स्कर्व्हीसारख्या दुर्धर आजाराने पछाडले. ससून हॉस्पिटलच्या सतत फेऱ्या, कडू भरमसाठ औषधे, इंजेक्शनस यांनी घरचे वातावरणही दवाखानामय झालेले; परंतु अण्णांनी व आईनी ज्या धीराने त्याला तोंड दिले ते आठवूनही अंगावर शहारा येतो. डॉ. खलप व डॉ. फडके यांचे योग्य उपचार, दैवाची साथ व आई अण्णांचे कष्ट यातून शारीरिकदृष्ट्या आमच्या पायावर उभे राहिलो. एवढेच नव्हे, तर पुढील आयुष्यातदेखील शिक्षण व अर्थार्जनातही स्वत:च्या पायावर उभे राहू शकलो.

करमणूक व मौजमजा कालानुरूप चालूच होती. दर रविवारी पर्वती पेशवे बाग, घरून नेलेली भेळ खाणे, उसाचा रस, ही चैन भानुविलास किंवा प्रभात टॉकिजला सहकुटुंब रामराज्य, सीता स्वयंवर, मोहित्यांची मंजुळा राजा शिवराय असे सिनेमे बघणे. अनंत मराठे नामक नट सिनेमात काम करतात म्हणून आवर्जून जाणे असे. आमची आजी म्हणजे नामजोशी सुगरण म्हणून तिचा मोठा नावलौकिक. भाजणीचे वडे, कडबोळी, साखरभात, सांज्याच्या, पुरणाच्या पोळ्या, अनारसे, मसालेभात हे उत्तम बनविण्यात तिचा हात कोणीच धरू शकणार नाही. आजीचे व अण्णांचे स्वभाव साधर्म्य हेकेखोरपणा व आपले तेच खरे ही वृत्ती असल्याने फारसे पटत नसावे. सरकारी नोकरी, हमखास नियमित मिळकत एवढे ओळखून आजीने अण्यांचे स्थळ पसंत करून आपली मोठी मुलगी कमल हिचे लग्न लावून दिले.

अण्णांचे स्वत:चे बालपण खूप कष्टात गेले. म्हशींचे दूध काढणे, गोठा आवरणे,

Marathe Pratishthan

लाकूडफाटा जमवून मगच शाळेत जावे लागे. कोकणात संगमेश्वराजवळ कळंबुशी हे आमचे गाव. आईवडिलांचे छत्र हरपल्याने मोठा भाऊ व वहिनी यांच्या देखरेखीत प्राथमिक शिक्षण झाले. मोठे भाऊ हेडमास्तर असल्याने शिक्षणाचे महत्त्व ओळखून पुढील शिक्षणासाठी पुणे येथे मोठ्या बहिणीकडे राहिले. पुढे तीही दुखणाईत झाल्याने वार लावून, माधुकरी मागून उदरनिर्वाह केला. पुण्यातील नावाजलेल्या नू.म.वि मध्ये इ. ५ वी ते मॅट्रीक थेट पूर्ण करून वेधशाळेच्या नोकरीत समाविष्ट झाले. या शाळेच्या ५ वी ब चा त्यांचा ग्रुप पुढे स्वत:च्या वयाच्या सत्तरीपर्यंत सहली,हुर्डापार्ट्या, संमेलने, जेवणावळी करीत होता. सदोदित उग्र चेहऱ्याच्या अण्णांना मित्रमंडळींमध्ये अरेतुरे म्हटलेले व हास्यविनोद केलेले पाहून आम्हाला खूप मजा वाटे.

नू. म. वि. शाळेच्या प्रांगणात गायक सुधीर फडके यांचा गीतरामायणाचा तीन दिवसांचा कार्यक्रम दरवर्षी होत असे. पुणेकर रसिक श्रवणभक्तीच्या आनंदसागरात अखंड डुंबत असत. हा कार्यक्रम सीझन तिकीट काढून आवर्जून ऐकला जाई. गाण्याप्रमाणेच प्रवासाची हौसही अण्णांनी शेजारील पांगारकर कुटुंबीयांसोबत पूर्ण केली होती. मुंबईचे आकर्षण मुंबईबाहेरील जनतेला किती ते वेगळे सांगायला नको. झुक झुक झुक झुक आगिनगाडीचा धावत्या मुंबई दर्शनाचा प्रवास आम्ही मोठ्या मजेत केला. राणीचा बाग, हँगिंग गार्डन, चौपाटी ही स्थळे उत्सुकतेने, डोळे भरून पाहिली. बालमनावर त्याचा आगळा परिणाम झाला. ह्या प्रवासाप्रमाणेच कोकणातील खेडेगावी कळंबुशी येथे एस.टी. या एकमेव साधन असलेल्या स्थळी जाणे वर्षातून एकदाच असे. जांभूळ, करवंदे, अळव (फळ), कैऱ्या, आंबे हा कोकणमेवा चाखण्याचा आनंद आगळाच असे. प्रवासाचे श्रम त्यामुळे विसरले जात. दगडी द्रोणी, चकचकीत तांब्याचे घंगाळे ही कालबाह्य झालेली भांडी नुकत्याच कोकणभेटीत अजूनही आवर्जून सांभाळून ठेवल्यामुळे जणू ऐतिहासिक ऐतिहासिक ऐवज पाहता आला. मुलांना ह्या गोष्टी तसेच ताड-माड, तोंडलीचे वेल, विहीर-रहाट, चित्रात पाहत असलेल्या ऐवजाचे दर्शन दुर्लभलाभ झाला. मराठे चुलतभावंडांनी मोठ्या हिरीरीने नवीन वास्तूत आधुनिक सोयीसुविधांत रूपांतर केले. अंगण व तुळशीवृंदावन सुरक्षित आहे. घरच्या कुलदैवतांचे दर्शन प्रसन्नता देत होते. चाळीस-पन्नास वर्षापूर्वीचे कोकण वास्तव्य राहणीमान शहरी वातावरणात राहिलेल्या आम्हा मुलांना थोडे रटाळ व एकाकी वाटे. सकाळी नाश्ता मऊभात, दुपारी पहिला, मधला, मागचा भात पुन्हा रात्री पिठलं भात सहनशक्तीचा अंत होई. पुण्याला आल्याबरोबर पोळ्या करून वाढता वाढता आईच्या नाकीनऊ येत.

कोकणातून पुढे सांगली, सातारा, पुणे, मुंबई येथे प्रस्थापित झालेली माझी चुलत, आते भावंडे प्रथम भेटण्यास अण्णांकडे येत. आई-अण्णांच्या प्रेमाच्या व आस्थेच्या वातावरणात आपुलकीने ते दोन-चार दिवस राहत. शिक्षण, नोकरी, लग्न अशा कारणांमुळे आलेली भावंडे आमच्यातीलच एक होऊन जात. हातावर दही घेऊन पुन्हा ये हो लवकर या आईच्या प्रेमळ संवादात माघारी वळत. सर्व नाती सांभाळत जावई मंडळींना अधिक महिन्यात सहकुटुंब बोलावून स्वहस्ते आग्रहाने पक्वान्ने वाढण्यात अण्णांना धन्यता वाटे. विडा (स्वत: केलेला) दक्षिणा, भेटवस्तू देऊन बोळवण केली जाई.

या सर्व कार्यक्रमात आईचा सक्रिय अदृश्य सहभाग असे. शास्त्रीय पद्धतीचे कोणतेही शिक्षण नसतानाही आई (कमल) मंगलाष्टके, डोहाळजेवणाची गाणी, बारशी, अशा प्रसंगी यथोचित गायन करी. तिचा गळा खरोखरच गोड, धाटणीपण सुरेख होती. एक रेडिओ आणून देण्यापलीकडे आईच्या गायनकलेची फारशी दखल अण्णांनी घेतलीच नाही. रांगोळी, विणकाम, शिवणकाम, अत्यंत निगुतीने करी. १३ डिसेंबर, २००३ ला भल्या पहाटे जणू काकडआरती स्वर्गात जाऊन म्हणण्यासाठीच यमाच्या हाकेला धावून गेली. वास्तविक दुसऱ्याच दिवशी तिच्या नातवाचे आलोकचे लग्न परंतु नातसून बघण्याचे भाग्य उरात दडपून अलिप्तपणे परलोकाधिन झाली. सध्या आमची वहिनी तिची लाडकी सून सौ. प्राची मात्र तिचा गाण्याचा वारसा शास्त्रीय शिक्षण पूर्ण करून हिरिरीने पुढे चालवत आहे. आम्हा सर्वानाच ही आनंदाची, कौतुकाची बाब वाटते.

आईच्या माघारी सव्वा वर्ष अण्णांनी उद्‌विग्न अवस्थेत काढली. स्तोत्र पुटपुटत, भगवद्‌गीता कायम उशाशी असे. शेवटच्या आजारपणात आईची त्यांनी खूप काळजी घेतली. त्यामुळे एकटेपण आले. मला डोंबिवलीला घेऊन चला असा त्यांचा धोशा असे. इकडे खूप खुश असत. चार दिवसापेक्षा टिकत नसत.

नू.म.वि. ५वी ब माजीविद्यार्थी ग्रुपप्रमाणेच मराठे प्रतिष्ठान पुणे याच्या निर्मिती आणि वाढीत अण्णांचा मोठा वाटा होता. आमच्या डोळ्यांसमोर सभा, संमेलने, आमंत्रणे पूर्व तयारी मी अनेक वर्षं पाहिली आहे. सौ. नीलांबरी वहिनींची उभयतांची साथ, तसेच अन्य कुलबांधवांची साथ अण्णांना खूप छान लाभली. हितगुज अंक इत्यादी आवडीचे विषय होते. २६ जानेवारी वेदशास्त्रोत्तेजक सभेचा हॉल हा कित्येक वर्ष मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनाचा दिवस ठरलेला होता. दोन महिने आधीच त्याची तयारी चाले. सायकलवरून घरोघरी जाऊन अण्णा सदस्यांना जागृत करीत. क्वचित पोस्टकार्डही रात्रीपर्यंत लिहित असत. त्यांच्या विशिष्ट ५ आकड्याची आम्हाला गंमत वाटे. आज १७ जानेवारी २०१३ रोजी ठाणे येथील त्याच्या मोठ्या नातवाच्या सुधांशु डोकेच्या अलिशान फ्लॅटमध्ये होत असलेल्या प्रतिष्ठान सभेत अण्णांची आठवण प्रत्येक सदस्याला आवर्जून येत आहे. ज्येष्ठ व श्रेष्ठ सदस्य श्री. वि. के. यांच्या सूचनेवरूनच हा लेखप्रपंच वास्तविक मी करत आहे. धाकट्या दोन बहिणी सौ. मंगला व सौ. लतिका आपल्या संसारात सुखी आहेत. आपल्या बागेतील नारळ, पेरू, जांभळे, आंबे सर्वांना प्रेमाने देणारे व चितळ्यांचे पेढे मुक्तहस्ते वाटणारे अण्णा आज माझ्या डोळ्यांपुढे त्यांच्या आठवणीनिशी तरळत आहेत. मला भास होतो आहे. डोक्याला टक्कल, पांढरा फुलशर्ट, धोतर, काखेत पेपराची घडी, उजव्या हाताचा पंजा डोळ्यांपुढे धरून डोळे किलकिले करून आपल्या सभेकडे कृतकृत्य नजरेने पाहत आहेत. बरे केलेस हो सगळ्या कंपनीला बोलावलेस, बेस केलेस असे म्हणत आहेत. कृतार्थपणे मल जणू आशीर्वाद देत आहेत. अर्थात हे सर्व लिहिण्याची प्रेरणा व आग्रह ज्येष्ठ सभासद वि. के. यांच्या आशीर्वादाने चार पानी लिखाण पूर्ण करते.

**- कुमुद सुदाम डोके, ठाणे**
फोन नं. : ०२२-२५८८१६५५



Marathe Pratishthan

# पसायदान

**- सौ. माधवी जाईल (पृ.७५३)**

माऊलीच्या मनात प्रकाशलेले विश्वाचे आर्त असे शब्दरूपाने पसायदान होऊन बाहेर पडलेले आहे.

ज्ञानेश्वरी संपूर्ण सांगून झाल्यावर, श्री ज्ञानेश्वर महाराजांनी परमेश्वराजवळ केलेली जी प्रार्थना म्हणजे पसायदान. ही एक वैश्विक प्रार्थना असून ती व्यक्ती, धर्म, जात, वय, लिंग यापैकी कोणतीही गोष्ट बंधनकारक नसून ती साऱ्या जगातील-विश्वातील लोकांसाठी आहे. केवळ महाराष्ट्रातल्याच नव्हे, मराठीभाषी माणसांची नाही, तर जगातल्या कोणीही ही प्रार्थना करावी. यातला विचार हा साऱ्या जगातील लोकांसाठी आहे. ज्ञानेश्वर महाराज ही प्रार्थना सबंध जगताचा जो नियंता त्याला उद्देशून करत आहेत.

'आता विश्वात्मके देवे' म्हणतात तेव्हा आधी संपूर्ण ज्ञानेश्वरी सांगून झाली आहे. भगवद्गीतेचे संपूर्ण विवेचन झालं आहे. माऊली ज्ञानेश्वरी सांगत असताना एकेका शब्दाचे पिंजून पिंजून विवेचन करून जणू विचारांचा पाऊस पडला आहे.

'आता' म्हणजे ही जी ज्ञानेश्वरी मी तुम्हाला सांगितली ती सांगून झाल्यावर, आता देवाला उद्देशून ज्ञानेश्वर महाराज बोलताहेत. ज्ञानेश्वर महाराज विठोबाचे भक्त आहेत. पण विठोबाच्या भक्ताने 'ॐ नमो जी आद्या। वेद प्रतिपाद्या।' असं म्हणताना जगाचा जो ऐसा धनि कवण तो। आद्य म्हणजे पहिला आरंभीचा पांडुरंग पहिला म्हटले तरी हरकत नाही. पांडुरंग हा परमात्मा आहे, पण पांडुरंग हे सगुण रूप आहे. परमात्मा सगुण नाही आहे. तो निर्गुण निराकार असा आहे. परमात्मा या विश्वाचा उत्पादनकर्ता,संचालक व संहारक सर्व काही आहे. ज्ञानेश्वर महाराज जेव्हा आरंभ करतात. तेव्हा ॐ नमोजी आद्या आत्मरूपा असं म्हणतात आणि ज्यावेळी समारोप करतात त्यावेळी 'आता विश्वात्मके देवे।' असं म्हणतात. विश्वात्मक देव याचा अर्थ आत्मानं विश्वं करोति इति विश्वात्मक। स्वत:लाच ज्यानं विश्व बनवलं असा तो विश्वात्मक विश्वरूप परमेश्वर. हे विश्वात दिसणार व्यक्त रूप आहे. 'येणे वाग्यज्ञे तोषावे, तोषोनि मज द्यावे पसायदान' हा जो वागयज्ञ मी केला आहे, इथे यज्ञ शब्द वापरलाय. हे माझं प्रवचन, माझे विवेचन असं म्हटलं नाही, कारण मी आला म्हणजे अहंकार आला. हा जो वागयज्ञ झाला त्याने संतुष्ट व्हावे. माऊली भगवंताजवळ प्रसाद मागते आहे. पसाय म्हणजे प्रसाद. प्रसाद म्हणजे कृपा. तू कृपा कर आणि मला हे दान दे. माऊली भगवंताला प्रार्थना करते, तू मला असा आशीर्वाद दे की जे 'जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रति वाढो भूता परस्परे पडो। मैत्र जीवाचे।' जे दुष्ट आहेत त्यांचा वाकडा शब्द (व्यंकट) वाकडेपणा, दुष्टपणा, कुटीलपणा ह्या वागण्याच्या प्रवृत्ती नाहीशा होवो. दुष्टांचा दुष्टपणा फक्त परमेश्वरच नाहीसा करू शकतो. म्हणून माऊलीचं बोलणं परमेश्वराला उद्देशून आहे. त्यांच्यातील चांगलेपणा असतो तो राहू दे, व वाईटपणा असतो तो जाऊ दे त्यांच्यातील जे सौजन्य उरले आहे ते वाढू देत. प्राणीमात्रात परस्परांबद्दल जीवाभावाची मैत्री निर्माण होऊ दे. आईवडिलांचे वात्सल्य, तरुणाचे एकमेकावरील प्रेम, मुलांचा वडीलधाऱ्याबद्दल आदर. साधुसंतांचे जगावर प्रेम असतेच.

'दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो। जो जे वांछिल तो ते लाहो। प्राणिजात', 'दुरित म्हणजे पाप तिमिर म्हणजे अंध:कार. पापात अंध:कार आहे. पापातला पापीपणा जाऊ दे. सारं विश्व स्वधर्मरूपी सूर्याने प्रकाशित होवो. स्वधर्माने वागल्यामुळे जे वांछावं ते वांछील म्हणजे नको ते वाछंणार नाही. सर्व प्राणीमात्रांचा माऊलीने उत्कट विचार केला आहे. ज्याला जे हवं ते त्याला मिळू दे. मांगल्याचा वर्षाव संत करतात. संत अमंगल वर्तन करीत नाहीत. केवळ मंगल व पवित्र. संत जिकडे जातात तिकडे आनंद निर्माण करतात. ईश्वर निष्ठा हृदयात निर्माण होऊ दे. त्यामुळे लोभ निर्माण होत नाही. अशा वृत्तीचा लोंढाचा लोंढा प्राणीमात्रांना सातत्याने भेटू दे. चला, कल्पतरूंचे आरव म्हणजे मांगल्याचा प्रसार करणारे जे साधू आहेत ते कल्पतरूंचे बाग आहेत. ज्याप्रमाणे कल्पतरू कल्पना करावेत ते देतो, त्याप्रमाणे चिंतामणी आपल्या मनात आणावं ते देणार. मनात येईल ते चांगलंच येईल. संत ते चंद्रमा आहेत. ते चंद्रासारखे शीतल आहेत; पण निष्कलंक आहेत. संत हे सूर्याप्रमाणे प्रकाशमान आहेत. पण तापहीन आहेत. चंद्रासारखे, सूर्यासारखे ते सज्जन सदा प्राप्त होवोत. अशाप्रकारे संत जगातल्या सर्व लोकांना उपलब्ध होऊ दे. ह्या प्रसादाची मागणी माऊलीने केली आहे. सर्व सुखांनी पूर्ण झालेले तुझे साधक भक्त आहेत. त्यांनी आदिपुरुषाला वंदन केले पाहिजे. या ग्रंथाचं तत्त्वज्ञान (ज्ञानेश्वरी) हे ज्यांच्या जीवनाचा अंगभूत भाग बनला आहे. त्यांना आधिभौतिक दृष्ट (दिसणार) आणि अध्यात्मिक म्हणजे अदृश्य (न दिसणारं) ते लौकिक आणि पारलौकिक दोन्हीत त्यांना विजयी होऊ दे. अशी प्रार्थना विश्वात्मक देवाला केली, म्हणजे प्रत्यक्ष पांडुरंगच समोर उभा राहिला. आणि म्हणाला, ज्ञानोबा तुझी इच्छा पूर्ण होईल. त्या परमेश्वराला म्हणून प्रार्थना करत आहेत, ते निवृत्तीनाथ, त्यांच्या मुखातून माऊलीने आशीर्वादाचे शब्द ऐकले. ज्ञानोबा हा होईल दान पसावो। हा प्रसाद लाभेल बरं तुला। तुझी इच्छा पूर्ण होईल। हे शब्द ऐकले आणि माऊली आनंदाने डोलू लागली.

**- सौ. माधवी जाईल (पृ.७५३)**
आदित्य नाकोडा के/एस गौरीशंकर, जुना जकात नाका, सिंहगड रोड, पुणे ४११०३०,
फोन : ०२०-२४२५१९

**जलबिंदू वेगळा झाला आणि स्वत:स समुद्र मानू लागला तर तो वाळवंटासारखा शुष्क होईल, पण समुद्राचे अस्तित्व मानून जर समुद्रालाच मिळाला तर तो स्वत: समुद्र होऊन जाईल.**

Marathe Pratishthan

डॉ. गिरीश जाखोटिया लिखित 'छत्रपती शिवाजी व २१ वे शतक' याचे पुस्तक परीक्षण

# छत्रपती शिवाजींच्या कर्तृत्वाचा २१ व्या शतकातील शोध आणि बोध

- सौ. मीना अनिल खाडीलकर

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचे लाडके दैवत. शिवरायांवर असंख्य पुस्तके लिहिली गेली व लिहिली जातील. यापैकी बहुतेक पुस्तके ही चरित्रात्मक व घटनात्मक आहेत. या सर्व पुस्तकांचा लेखाजोगा व संदर्भीय मूल्य ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. आजच्या युवा पिढीला छत्रपतींचे कर्तृत्व व तत्त्वज्ञान हे २१व्या शतकाच्या संदर्भात कळायला हवे. त्यांचे समाजकारण, अर्थकारण व राजकारण आजही कसे अत्यंत उपयोगी आहे हे युवकांना आजच्या परिस्थितीचा आढावा घेत समजून सांगायला हवे.

सिद्धहस्त लेखक, विख्यात व्यवस्थापन व अर्थतज्ज्ञ डॉ. गिरीश जाखोटियांनी ही २१व्या शतकातील तातडीची गरज पूर्ण केली आहे. त्यांचे 'छत्रपती शिवाजी व २१ वे शतक' हे राजेंद्र प्रकाशन, मुंबईचे नुकतेच प्रकाशित केलेले पुस्तक छत्रपतींच्या कर्तृत्वपणे व तत्त्वज्ञानाचे उत्तम विश्लेषण २१ व्या शतकाचा संदर्भ घेत वाचकांपुढे मांडते. छत्रपतींचे अर्थकारण व कल्याणकारी राज्य, त्यांची गृहनीती व व्यवस्थापकीय कौशल्य, त्यांची नेतृत्त्व शैली व त्यांचे आदर्श चारित्र्य अत्यंत ओघवत्या व कल्पक शैलीत डॉ. जाखोटियांनी मांडले आहे.

छत्रपतींनी 'आध्यात्मिक अर्थशास्त्रा'ची मूलतत्त्वे कल्याणकारी राज्याच्या उभारणीसाठी कशी वापरली हे सांगताना लेखकाने २१व्या शतकातील चुकीच्या अर्थकारणाची परखड चिकित्सा केली आहे. 'उपभोगशून्य स्वामी'ची संकल्पना व सर्वसामान्यांसाठीचे राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजच्या राजकीय नेत्यांनी फक्त भूलथापा न मारता छत्रपतींच्या नेतृत्त्वाचा आदर्श कसा पुढे चालवावा यासंबंधी डॉ. जाखोटिया अत्यंत सूत्रबद्धतेने मांडणी करतात. असे करताना स्वत:च्या बोचऱ्या कविता वापरीत ते आजच्या राजकारण्यांना पूर्णपणे उघडे पाडतात. राजकारण व अर्थकारण एकत्रितपणे हाताळताना छत्रपतींनी कोणत्या संकल्पना कशा वापरल्या, याचे अभ्यासपूर्ण विवेचन लेखक आपल्यासमोर मांडतो.

डॉ. जाखोटिया एक निष्णात व्यवस्थापन-तज्ज्ञ असल्याने त्यांनी छत्रपतींचे व्यवस्थापन व व्यवस्थापकीय कौशल्य अत्यंत सुंदररित्या मांडले आहे. व्यूहरचनाकार व व्यवस्थापक अशा दोन्ही भूमिका छत्रपतींनी वेळोवेळी कशा कल्पकतेने साकारल्या व रयतेचे भले साधले याचा विविध आकृत्या वापरून डॉ. जाखोटिया विस्तृत आढावा देतात. 'प्रोजेक्ट अफजलखान' हा भाग अत्यंत वाचनीय झाला आहे. आजच्या कार्पोरेट जगतामध्ये

व आंतरराष्ट्रीय राजकारणातही भारताच्या भल्यासाठी छत्रपतींची व्यूहनीती कशी उपयोगी पडू शकते, याचे सोदाहरण प्रतिपादन लेखक करतो.

व्यक्तिगत व सार्वजनिक चारित्र्य उत्तम असेल तर एखादे राष्ट्र प्रगतीपथावर राहू शकते. अमेरिकेची व युरोपची पडझड म्हणजे चारित्र्य बिघडल्याचा पुरावा होय. शिवराय 'संपूर्ण चारित्र्या'च्या संकल्पनेबद्दल आग्रही होते नी म्हणूनच उत्तम स्वराज्याची उभारणी होऊ शकली. चारित्र्यवान नेतृत्त्व कसे घडते व घडले पाहिजे, याची मुद्देसूद मांडणी पुस्तकाच्या अखेरच्या भागात करण्यात आली आहे. २१व्या शतकातील 'चारित्र्य'च्या संकल्पनेबाबतचा गोंधळ हे पुस्तक वाचून निश्चितपणे दूर होतो.

वारकरी संप्रदाय शेतकऱ्यांना कसे एकत्र आणू शकतो, विविध प्रकारच्या भ्रष्टाचारांवर 'गनिमी काव्या'ने कशी मात करता येऊ शकेल, खेड्यांना व तालुक्यांना कसे स्वयंनिर्भर करता येईल, भावनांक-बुद्ध्यांक-सामाजिकांक व उर्जांकाचा संतुलित वापर कसाा साधता येईल इ. अनेक उपयोगी गोष्टी डॉ. जाखोटियांनी या पुस्तकात मांडल्या आहेत. काही निवडक मावळ्यांना सोबतीला घेऊन शिवरायांनी स्वराज्य उभारणीच्या खडतर कामास प्रारंभ केला आणि एक आदर्श स्वराज्य-रयतेचे राज्य उभे केले. डॉ. जाखोटिया याच महत्त्वाचा सूत्राला आजच्या युवकांसमोर उत्तमरित्या मांडतात.

या पुस्तकाचे महत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने केलेला स्वरचित कवितांचा कल्पक वापर. डॉ. जाखोटिया हे एक उत्तम कवी आहेत. हे नि:संशयपणे जाणवते. शिवरायांचे समकालीन असलेले संत तुकाराम व संत रामदास ह्यांच्या काही निवडक अभंगांचा लेखकाने सुयोग्य वापर केला आहे. शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाबद्दलचे २१व्या शतकातील हे पुस्तक खूप आगळे वेगळे ठरले आहे. मराठी साहित्यातील हा एक मैलाचा दगड ठरावा. डॉ. गिरीश जाखोटियांच्या समर्थ लेखणीतून उतरणाऱ्या पुढील पुस्तकाची अशीच वाट पाहूया. शिवरायांवरील हे पुस्तक मात्र घरोघरी वाचले गेले पाहिजे.

**- सौ. मीना अनिल खाडीलकर**

पृष्ठे : २४७, किंमत : २०० रु.,
प्रकाशक : राजेंद्र प्रकाशन,
गिरगाव, मुंबई फोन -२३८२३५४८

**मानसन्मान**

'ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन इन इंटरनॅशनल ट्रेड, फ्लोरिडा' शरयू जाखोटियास पुरस्कार. फ्लोरिडा येथील 'युनिव्हर्सिटी ऑफ मायामी' मध्ये आंतरराष्ट्रीय उद्योगात एम.बी.ए. करणाऱ्या चि. शरयू गिरीश जाखोटिया हिला 'ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन इन इंटरनॅशनल ट्रेड' या नामांकित संस्थेचा २०१२ सालचा पुरस्कार जाहीर झाला आहे. १५ नोव्हेंबर २०१२ रोजी हा पुरस्कार फ्लोरिडा येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत तिला दिला जाईल. दोन हजार डॉलर व सन्मानपत्र असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे. नव्या उद्योजकीय कल्पना, उद्योजकीय प्रकल्पामधील सहभाग व एकूण वार्षिक अध्ययनातील कामगिरी या निकषांवर आधारित हा पुरस्कार दिला जातो. या पूर्वीही शरयूने न्यूयॉर्क येथील परिषदेमध्ये तिच्या विद्यापीठाचे प्रतिनिधित्त्व केले आहे. मुंबई येथील डॉ. गिरीश व मंजिरी जाखोटिया या उद्योजकीय सल्लागार दाम्पत्याची शरयू ही ज्येष्ठ कन्या आहे. (मंजिरी मराठ्यांच्या माहेरवाशीण आहेत. पृ.१२९)



Marathe Pratishthan

# रंग माझा काळा

- श्रीमती जयश्री विनायक मराठे, (पृ. ३०७)

काळा रंग आणि माणसाचं खरं म्हणजे खूप जवळचे नाते आहे. माणूस श्रद्धा, भक्ती व विश्वास यावर जगत असतो. श्रद्धेच्या विटेवरच संसाराचा डोलारा उभा करतो. विटेवर युगानुयुगे उभा असलेला महाराष्ट्राचे कुलदैवत असलेला विठ्ठलसुद्धा काळाच आहे. सोमवारी शंकराची पूजा आपण करतो. त्याला फुले पांढरी आवडतात पण त्याची पिंडी काळीच असते. त्याच्या गळ्यातील सापही काळाच असतो. शिवाय त्याच्यासमोर बसलेले त्याचे वाहन नंदीसुद्धा काळाच असतो.

आपण बाळाला अंघोळ घातल्यावर पावडर सोबत तीट काळी लावतो. बाळ छान दिसते. त्याला कोणाची नजर लागू नये हा हेतू असतो. सुंदर युवतींच्या डोळ्यांना काजळाने शोभा येते. माणसाला आपले पांढरे झालेले केस आवडत नाहीत, म्हणून ते काळे करण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न करून ते काळे केले जातात. आपण सर्व अन्यायाविरुद्धची चीड, मनातील राग अहिंसेने व्यक्त करताना, शांतपणे काळ्या रंगाच्या पट्ट्या लावून मुकाट्याने काम करत असतो.

सकाळी झोपून उठल्यावर देवाचे प्रात:स्मरण झाल्यावर काळ्या रंगाच्या पावडरचा झक्कास चहा पिऊन तरतरीत होतो. त्यानंतर घरातून बाहेर पडताना उन्हापासून किंवा पावसापासून रक्षण होण्यासाठी छत्रीचा उपयोग करतो. तिचा रंग पूर्वापारपासून काळाच वापरत आलो आहोत. आजच्या जमान्यात रंगीत छत्र्या आल्या. आपण शिक्षणाचा श्रीगणेशा करताना दगडी पाटीच वापरतो. तिचा रंगही काळाच असतो. शाळेत शिक्षक काळ्या फळ्याचा उपयोग करतात.

जीवनाचा शेवट झाल्यावर पिंडास काळा कावळा शिवण्याची आवश्यकता असते. पिंडावर काळे तीळच वाहिले जातात. हिंदू धर्मात काळ्या गाईला फार महत्त्व असते. तिला कपिला म्हणतात. आयुर्वेदात काळ्या गायीच्या दूध, दही, तुपाला अधिक महत्त्व आहे. काळ्या रंगाची रात्र असते पण ती सर्वांना आराम देते. ती संपल्यावर चैतन्यमयी पहाट येते. कुमारिका विवाह झाल्यावर गळ्यात मंगळसूत्र घालते त्या मण्यांचा रंगही काळाच असतो. मंगळसूत्राने तिच्या गळ्याला शोभा येते. तिचा पहिला संक्रांत सण काळा असतो. काळी साडी नेसवून तिचे कौतुक केले जाते. स्त्रियांना काळ्या रंगाच्या साड्या खूप आवडतात, पण आमच्या देवाला काळा रंग चालत नाही. आमच्या घराण्यात काळ्या रंगाला बंदी आहे असा गैरसमज पसरवला जातो. खुद्द श्रीसत्यनारायण पूजेत, विठूरायाला काळा बुक्का खूप आवडतो. आपण तो आपल्या कपाळाला लावतो. वाहन सुरक्षित राहण्यासाठी काळा बिब्बा व मिरच्या लावतात. बंगल्याच्या मुख्य दारावर काळ्या बाहुल्या लावतात. वर्षानुवर्षे हनुमंताला व शनिला काळा रंग आवडतो. होमामध्ये काळे तीळ वापरतात, कारण काळोख नष्ट केल्याशिवाय प्रकाश मिळणार नाही.


आपण ज्या पुस्तकाद्वारे ज्ञान घेतो त्यावरची अक्षरे काळीच असतात. महत्त्वाच्या कामासाठी काळे पेन वापरतो. चित्र काढल्यावर काळ्या रंगाने आऊट लाईन दिली जाते. लगेच चित्र उठावदार दिसते. काळ्या रंगाचे मूल झाले तर आई किंवा घरातील माणसे त्याला टाकत नाहीत. आई ममतेने त्याचे पालन करते. कोनशिला समारंभात आपण पाहतो कोनशिला काळीच असते. वर अक्षरे पांढरी लिहिली जातात. काळ्या ढगांमुळे पाऊस बरसतो. काळे ढग पाहून मोर नाचतात. कोकीळचा रंग पूर्ण काळा पण आवाज मधुर, हवाहवासा वाटणारा असतो. काळी माता आपण आई मानतो, कारण माणसाला जगण्यासाठी लागणारे अन्न तिच्यातून भरपूर प्रमाणात मिळते. काळ्या रंगाच्या कोळशामुळे आगगाडीचे इंजिन चालते. वीज निर्मिती होते. काळ्या रंगाच्या तव्यावर पोळ्या खुसखुशीत भाजल्या जातात. काळ्या रंगाच्या कढईत खुसखुशीत तळण केले जाते.

असा हा काळा रंग इतका महत्त्वाचा असूनही समाज काळ्या रंगाचा तिरस्कार करतो. समाजाने काळा रंग हा सर्वोच्च रंग आहे असे मानले पाहिजे.

श्रीमती जयश्री विनायक मराठे, (पृ. ३०७)
७/श्री कुटीर सोसायटी, पहिला मजला. मानपाडा
क्रॉस रोड, अयोध्यानगरी, डोंबिवली (पू.) ४२१२०१,
फोन : ०२२-२४२४४०३
मोबाईल : ९६१९३४४६१३

## सहवेदना

श्री. अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२) यांच्या मातोश्री **कै. गिरीजाबाई महादेव चक्रदेव** यांचे दिनांक १९ सप्टेंबर २०१२ या दिवशी दु:खद निधन झाले. त्यांचे वय १०० चालू होते. घरात त्याच सर्वात ज्येष्ठ व अनुभवी असल्यामुळे सर्वांना त्यांचा फार मोठा आधार होता. पूर्वीच्या रितीरिवाजानुसार वयाच्या तेराव्या वर्षीच विवाह होऊन त्या सासरी आल्या होत्या. तेव्हापासून घराची सर्वार्थाने जबाबदारी त्यांनी उचलली होती. घरात आल्या गेल्यांचा प्रचंड व्याप होता. नातेवाईकांची लग्नकार्ये, शिक्षणं पुण्यात स्थायिक असल्यामुळे त्यांनी मन:पूर्वक पार पाडली. अगदी उतार वयात एक ज्येष्ठ कन्या व दोन धाकटे सुपुत्र यांचा वियोग त्यांनी सहन केला. तो केवळ निकोप शरीरप्रकृती आणि मनाच्या खंबीरपणामुळेच.



परमेश्वर मातोश्रींचे आत्म्यास शांती देवो हीच मन:पूर्वक प्रार्थना!

०मराठे प्रतिष्ठानद्वारे कै. गिरीजाबाई महादेव चक्रदेव यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

- अच्युत महादेव चक्रदेव **(पृ.७३२)**
कारागृह अधिक्षक, पुणे (निवृत्त) २६, शुक्रवार पेठ, भाऊमहाराज रस्ता, पुणे ४११००२



Marathe Pratishthan

## सहवेदना

**कै. गजानन भास्कर मराठे**, घाटकोपर भभ(वय ८२ वर्षे) (पृ.४२५), यांचे दिनांक २२.१२.२०१२ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. बीइएसटी (बेस्ट) प्रशासनात ते अनेक वर्षे सचिव पदावर होते. ज्येष्ठ नागरिक संघ, बेस्ट वसाहत, घाटकोपर (पूर्व) चे ते सुमारे दशकभर अध्यक्ष होते. बेस्ट मधील गमतीजमती या एकपात्री कार्यक्रमाचे सुमारे ५००हून अधिक प्रयोग त्यांनी केले होते. त्यांचे साहित्यप्रेम, विस्तृत वाचन, अनुभव त्यांनी लिहिलेल्या विविध लेखांतून, पत्रांमधून प्रतीत होत असे. 'बेस्ट एम्प्लॉयीज असोसिएशन'च्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत त्यांनी शेकडो सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. 'हितगुज' मध्ये देखील त्यांचे लेख-पत्रे प्रसिद्ध झाली होती.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो ही प्रार्थना.

**- प्रेषक अशोक गजानन मराठे**

सी,२/१, कॅश्युरिना सोसायटी, घाटकोपर बसडेपोजवळ,

घाटकोपर (पू.) मुंबई ४०००७५, फोन. ०२२-२५०००४५७

कै. गजानन मराठे यांचे दरवर्षी 'दिवाळी फराळ' म्हणून खुसखुशीत ललित लेखन 'हितगुज' मधून प्रकाशित होत असे. मराठे प्रतिष्ठानवर त्यांचा लोभ होता. 'हितगुज' मासिकाविषयी नेहमी चांगला अभिप्राय ते देत असत. ते 'हितगुज'चे पूर्वीपासूनचे लेखक व वाचक होते. बेस्ट ग. भा. मराठे असे ते ओळखले जायचे. मराठे परिवाराच्या संमेलनातही त्यांनी अनेकदा कार्यक्रम केले होते. त्यांच्या निधनाने मराठे परिवार एका चांगल्या लेखकास मुकला आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारे कै. श्री. गजानन भास्कर मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- संपादिका**

## ट्राम

ट्राम आणि बस या दोघी बहिणी
एक होती ताई तर दुसरी होती माई ॥१॥
ठण, ठण, करत ट्राम रूळावरून चाले
बस मात्र रस्त्यावरून इकडून तिकडे धावे ॥२॥ ३
क्रॉसिंगला दोघीजणी क्षणभर कधी भेटत
जीवनातील सुखदु:खे तिथे त्या बोलत॥३॥
आमच्याच सरकारने मोडीत तिला काढले
आता परत चालू करू असे म्हणू लागले॥४॥
तोपर्यंत वाढली इथे वस्ती किती फार
जागा तिला उरली नाही इथे तिला फार॥५॥
मोठे मोठे तंत्रज्ञ विचार करू लागले
त्याच्यापेक्षा स्कायबस बरी असे म्हणू लागले ॥६॥
मनी तुमच्या आले कधी, बघावी आपली ट्राम
कलकत्त्याला जायला हवे, इथून तुम्हाला लांब॥७॥
एके काळी होती आमच्या मुंबईची शान
आम्ही आता तुला करतो इथूनच सलाम॥८॥

**- सौ. उषा विठ्ठल लेले (मराठे), मुंबई**

## मानसन्मान

कु. आभा अभिजित मराठे हिचा पूर्व माध्यमिक शालांत शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यातून ४था गुणानुक्रमांक आला आहे. तिला ३०० पैकी २७४ गुण मिळाले. तसेच चि. आभाला International Mental Arithmetic Certificate of Graduation मिळाले आहे. हा समारंभ दादर येथील किंग्ज जॉर्ज शाळेत पार पडला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. आभा अभिजित मराठे हिचे हार्दिक अभिनंदन! असेच यश पुढे सतत मिळत राहो ही शुभेच्छा!

**- सौ. अनुराधा मराठे**
**(पृ.२९२)**
(आभाची आजी) डोंबिवली.



Marathe Pratishthan

## ‘हितगुज’ राखीव फंड निधी : वर्गणी-देणगी देणाऱ्या कुलबांधवांची नावे

मोरेश्वर प्रभाकर मराठे, पुणे, रमेश केशव खांबेटे, पुणे, श्री. बळवंत (मिलिंद) अरविंद मराठे, पुण, श्रीकृष्ण सिद्धेश्वर मराठे, पुणे, श्रीराम व्यंकटेश मराठे, पुणे, महेश अनंत मराठे, मुलंड, मधुसूदन य. मराठे, पुणे, वसंत कृष्णाजी मराठे, पुणे, रघुनाथ गोविंद मराठे, पुणे, सौ. नीलांबरी रमेश मराठे, पुणे, श्री. अनुरूप भिकाजी मराठे, पुणे, सौ. अनुराधा गजानन मराठे, तळेगाव-दाभाडे, श्री. वि. के. मराठे, वरळी, मुंबई, श्री. मुकुंद त्र्यंबक फडणीस, बोरिवली, डॉ. अभिजित प्रभाकर फडणीस, ठाणे, श्रीपाद नारायण मराठे, कोल्हापूर, सखाराम नागेश मराठे, चुनाभट्टी, पुरुषोत्तम एम. मराठे, नाशिक, सदानंद विष्णू मराठे, बांद्रे, किरण सीताराम मराठे, देवळाली, विजयकुमा सीताराम मराठे, भाईंदर, प्रकाश गणेश विद्वांस, अहमदाबाद, अरुण शिवराम मराठे, मडगाव (गोवा), अरुण भिकाजी मराठे, बडोदे, सुरेश नारायण मराठे, ठाणे, सुधीर बाळकृष्ण मराठे, विलेपार्ले, सुनील जनार्दन मराठे, श्री. भा. ल. महाबळ, मुलुंड, श्री. पुष्कराज वामन मराठे, पुणे, श्री. प्र. सि. मराठे, वाकोला (मुंबई), श्री. विश्वास श्याम चक्रदेव, नागपूर, सौ. शुभदा श्रीराम शिंत्रे, चुनाभट्टी, डॉ. सुनील यशवंत मराठे, माणगाव (रायगड), रघुवीर वि. मराठे, बडोदे, सौ. मीना य. मराठे, पुणे, अरुण भिकाजी मराठे, बडोदे, पद्माकर नरहर मराठे, नागपूर, श्री. वि. म. मराठे, सांगली, प्रमोद कृष्ण मराठे, ठाणे, सौ. ऋतुजा माधव गोडसे, चेंबूर, श्री. अनंत सदाशिव मराठे, मुलुंड, मोहन सदाशिव मराठे, खार, सीताराम गोपाळ खांबेटे, अंधेरी, श्रीमती कुमुद सुदाम डोके,ठाणे, सौ. शुभदा श्रीराम शिंत्रे, चुनाभट्टी, अरविंद दामोदर मराठे, डोंबिवली, श्री. गोविंद नारायण मराठे, तिस्कगाव (गोवा), श्री. प्रभाकर दामोदर मराठे, वडाळा, सौ.जयश्री विनायक मराठे,डोंबिवली, सौ. शुभदा शंकर मराठे,पुणे, प्रभाकर रामकृष्ण खांबेटे,ठाणे, विजय प्रभाकर मराठे, बंगलोर, विलास नारायण मराठे, ठाणे, राजेंद्र जयंत मराठे,माटुंगा, श्री. सदाशिव बळवंत मराठे,बडोदे,सौ. मंजिरी गिरीश जाखोटिया (मराठे),विलेपार्ले, श्री. राजाराम नारायण मराठे,(चित्रकार राजा मराठे, मालाड), अरुण गणेश मराठे,दादर, रामकृष्ण गणेश मराठे, बोरविली, श्री. मोहन वि. मराठे, बडोदे, रत्नाकर सुंदर मराठे, पाली (रायगड), हरि पुरुषोत्तम मराठे, कर्जत (रायगड), श्री. बळवंत विद्वांस, मालाड, सदानंद धुंडीराज मराठे, ठाणे, सौ. उषा विठ्ठल लेले, कुर्ला, सौ. नीलिमा विष्णू विद्वांस, बदलापूर.

‘हितगुज’ला वर्गणी आणि देणगी देणाऱ्या या सर्व कुलबांधव-कुलभगिनींचे हार्दिक आभार!

**विशेष सूचना : ‘हितगुज’ राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे ‘मराठे प्रतिष्ठान’ या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी. तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा, अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC CODE : SRCB0000010 असा आहे.**

## श्रीमती मंगला मराठे यांचे सूनेविषयीचे मनोगत

माझे अवलोकन व अनुभव यातून माझ्या मनात साकारलेली सौ. मंजिरीची प्रतिमा

चि. मोहन व सो. मंजिरीचे लग्न झाल्यानंतर थोडे दिवसांनी मंजिरीने मला सांगितले त्यावरून एकेक आठवत गेले ते असे नवऱ्या मुलाला बघण्याआधी तिने आम्हा दोघांना बघितले व आम्हा दोघांना सासू-सासरे म्हणून पसंत करून सासर पसंत करणारी - लग्न झाल्यानंतर काही वर्षे; जुनाट व गैरसोयीच्या जागेत समाधानाने राहणारी - चि. मयूरेश लहान असून त्याचे सर्व करून जिद्दीने मॉंटेसरीचा कोर्स करणारी - थोडासा तापट - आरडाओरड करून मोठ्याने बोलणाऱ्या नवऱ्याला सांभाळून घेणारी, त्याच्या व्यवसायाची लाज न बाळगणारी, कुठल्याही समारंभात हौसेने जबाबदारी घेऊन मदत करणारी, कुल परंपरा मनोभावे पार पाडणारी, तितक्याच तत्परतेने कर्तव्याला न चुकणारी, मन:स्ताप देणाऱ्या घटना, झालेगेले गंगेला मिळाले अशी स्वत:ची समजूत घालून विसरणारी, घरांतले वाद वाढू नयेत म्हणून कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी, नातेवाईक, परिचयातील मंडळींना काही निमित्ताने बोलावून त्यांना नवनवीन पदार्थ खायला घालून, तृप्त करून त्यात आनंद मानणारी, अशी आहे मंजिरी.

हल्लीच्या दृष्टीने दोघेही कमी शिकलेले असले तरी सौ. मंजिरीत अनेक कलागुण आहेत. त्या कलांचा तिने शाळेत खूप उपयोग केला असणार. शाळेने तिला आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्कार दिला तो तिच्या कलागुणावरच. आता तिला शिशुमंदिराची मुख्याध्यापिका म्हणून मानाचे स्थान मिळाले आहे. हे सर्व तिने स्वत:च्या कर्तृत्वावर मिळवले आहे. म्हणून म्हणावेसे वाटते ‘आज सौ. मंजिरी-बैसली मानाच्या शिखरी’

एकंदरीत सर्वदृष्टीने पाहता चि. मोहनचे भाग्य व त्याबरोबरच आमचेही म्हणून सौ. मंजिरी सारखी बायको व आम्हाला सून मिळाली. यापुढील आयुष्याची दोघांची वाटचाल अशीच यशस्वी व समृद्धीची होवो आणि दोघांना निरोगी, उदंड आयुष्या लाभो हा शुभाशिर्वाद

**- मंगला मराठे**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची. जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची बैठक दिनांक २२ नोव्हेंबर, २०१२ रोजी श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या निवासस्थानी माहीम येथे भरली. कार्यवाहांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले. पत्रव्यवहार वाचून यासाठी हितगुजनिधीत भर पडली पाहिजे असे सर्वानुमते ठरले. या बैठकीला प्रमुख पाहुणे राजापूरच्या शिवसेने-भाजपाच्या नगराध्यक्षा सौ.अपूर्वा आनंद मराठे सहकुटुंब उपस्थित होत्या. मराठे कार्यकारिणीशी त्यांचा परिचय झाला. या भेटीगाठीत त्यांनी त्यांना आलेले राजकारणातले अनुभव मोकळेपणाने सांगितले. श्री. भाऊ मराठे यांनी मनोरंजक किस्से नेहमीच्या खुमासदार शैलीने सांगितले. चहा-फराळाने सभेची सांगता झाली.

मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची बैठक दिनांक १७ जानेवारी २०१३ ला ठाणे येथे मराठ्यांची माहेरवाशीण चित्रकार श्रीमती कुमुदताई डोके यांचे चिरंजीव श्री. सुधांशु डोके यांच्या आलिशान प्लॅटमध्ये भरली. गेले अनेक दिवस कुमुदताईची इच्छा होती की आमच्या घरी मराठे प्रतिष्ठानची सभा व्हावी आणि मला आदरातिथ्याची संधी द्यावी. हा सुयोग जुळून आल्यामुळे कुमुदताई खुश होत्या. माहेरची माणसे घरी आल्यावर जसा आनंद होतो तसा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. त्यांच्या वडिलांचा अण्णा, वामन आत्माराम मराठे यांचा मराठे प्रतिष्ठानवर फार लोभ होता. सर्व एकत्र जमल्यावर अण्णांच्या आठवणी जागवल्या गेल्या. ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य श्री. विनायक केशव मराठे, वरळी यांनी कुमुदताईंना वडिलांविषयी लिहिण्यास सांगितले. त्यांनी ते तात्काळ मान्य केले. या अंकात 'आमचे अण्णा' हा लेख आहे.

गरम गरम कांदापोहे, गाजर हलवा अशा अल्पोपहाराने सभेची सांगता झाली.

**पुस्तक परिचय**

**नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी आध्यात्मिक बळ : 'विघ्नों पर विजय'**

२६ जानेवारीला वेदशास्त्रोत्तेजक सभाा कार्यक्रमात नुकत्याच प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन, लेखिका सौ. सरोजिनी मराठे व श्री. अनुरूप मराठे यांनी केले. आपदा प्रबन्धन या मुख्य विषयाचे चित्रमय वर्णन विशेषत: त्या विषयीचा आध्यात्मिक दृष्टीकोन सर्वांना आवडला.

संकटांना शौर्याने तोंड देऊन सफलता व सुरक्षितता प्राप्त करण्याचे व्यावहारिक उपाय, सावधगिरी आणि त्याबरोबरच परमपिता परमात्म्याशी मन-बुद्धीची तार जोडून, त्या करुणाघन पित्याकडून इशारे प्राप्त करणे, अष्टशक्ती जागृत करून जीवनात आनंद व सकारात्मक चिंतन कसे मिळावे याचे सुबोध, सुंदर वर्णन या पुस्तकात केले आहे. अनेक व्यक्तींचे सत्य अनुभव व रोजच्या जीवनातील छोट्या मोठ्या समस्यांचे समाधान याबद्दलच्या उदाहरणांची रेलचेल यामुळे या पुस्तकाच्या आशयाला एक भक्कमपणा आला आहे.

मनुष्यमनाचे प्रतिबिंब निसर्गात झालेले दिसते. हा मुद्दा सांगताना उदाहरणे दिली आहेत ती अशी-

*क्रोध का उद्रेक ..... ज्वालामुखी*
*दुरभिमान व क्रोध दबना ......भूकंप*
*लोभ, चिंता की अति ....... बाढ, सुनामी*
*लालसा, बेलगाम इच्छा.... चक्रवात*
*स्वार्थ, आलस्य ...... अकाल*
*असन्तुष्टता, मत्सर, बकवाद ...... महामारी*
*लगाव ........व्यसन*

नैसर्गिक आपदा टाळण्यासाठी पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांना रोज शांतीचे व पवित्रतेचे दान, ईश्वराशी एकाग्र मनाने करावे व त्या पाच तत्त्वांकडून दानशूरपणा, शीतलता, परिवर्तनशक्ती, हलके राहणे व विशालता हे गुण क्रमश: शिकावे.

मनुष्याचे संकटे व दु:खे यांचे मूळ असलेले कामक्रोधादी पाच विकार जिंकण्यासाठी त्यांचे उदात्तीकरण करावे. कामविकाराचे रूपांतर शुभकामना व पवित्र प्रेमात, क्रोधाचे रूपांतर स्वत:च्या अवगुणांवर क्रोध करण्यात, लोभाचे रूपांतर सद्विचारांच्या संग्रहात, मोहाचे रूपांतर ईश्वरावर मातापिता बंधूसारखा इत्यादि नात्यांनी प्रेम करण्यातव अहंकाराचे रूपांतर आत्म्याचा शुद्ध अभिमान बाळगण्यात करावे. अशारितीने 'कर्मयोगी व स्थितप्रज्ञ' या स्थितींमध्ये संपूर्णता प्राप्त करण्यासाठी योगाच्या अनेक कॉमेंटरीज, चार्टस, कृतियोजना, इत्यादि आकृत्यांनी, चित्रांनी हे पुस्तक समृद्ध व लक्षवेधक झाले आहे. पुस्तक मिळवण्यासाठी फोन करावा : **सौ. सरोजिनी मराठे, पुणे. मोबाइल : ९०४९८६२४३६**

**'विघ्नोंपर विजय', पृष्ठे २९०, किंमत : ६० रु.**



Marathe Pratishthan

# अशी पाखरे येती

सौ.नीलिमा विष्णू विद्वांस

अपू नावाची आमची एक मनूताई होती. शेजार घरची पण हेच घर आपले अशा थाटात ती बहुतेक वेळा आमच्याकडे असावयाची. तिची कितीतरी बाळं आमच्याकडेच झाली आणि वाढलीसुद्धा. पण मोठी झाल्यावर निघून गेली. नंतर अपूनी एका छोट्या पोरीला जन्म दिला आमच्याकडे पण मोठी झाली तरी ती निघून न जाता आमच्याकडेच वाढली, राहिली. आम्ही तिचे नाव गौरी ठेवले. ती शुक्रवारी झाली होती म्हणून ती गौरी. गौरी आई होईपर्यंत अपू आमच्या इथेच बाळांना जन्म देत असे. पण निसर्गनियमानुसार गौरी मोठी होऊन आई झाली आणि अपूने आमच्या इथे त्या कार्यक्रमाला रामराम ठोकला, पण पूर्वीसारखे येणे-जाणे होतेच.

आता बहुतेकवेळा ती शेजार घरीच बाळांना जन्म देत असे, पण उजाडल्यापासून आमच्याकडेच येत असे. बाळे चालू लागली की तिच्या मागून ती पोरं येत असत. खाऊन-पिऊन तृप्त होऊन मग ती बाहेर जात असत. पण अपूचा मुक्काम आमच्या इथेच असावायचा. ती आता आठ वर्षांची झाली होती. पण पहिल्याइतकीच देखणी दिसत होती. अशातच तिने परत एका पांढऱ्या शुभ्र बाळाला जन्म दिला. खूपच गोंडस, गोजिरवाणं ते बाळ दिसत होते. बाळाला तिथे ठेवून ही खाण्यापिण्याला येत असे पण आता लगेच जात असे. बाळाच्या काळजीने. साधारण दीड महिन्यांनी ते पोर तिच्यामागून आमच्याकडे येऊ लागले. सशासारखे दिसत होते ते बाळ. निळसर डोळे,गुलाबी नाक, ओठ आणि गुबगुबीत शरीर. देवानी रूपवान पोर दिल्याने तीसुद्धा त्याला खूपच जपत होती आणि आम्हीसुद्धा. बाळ मात्र तिला न जुमानता उड्या मारीतच चालत होते ती त्याला प्रेमाने जवळ घेऊन चालू लागली की ते पोर तिच्या हातून निसटून लांब पळत असे. पण परत वाऱ्याच्या वेगाने येऊन गोजिरवाणं बछडं आईच्या पाठीवर झेप घेत असे. जणू काही घोड्यावरची स्वारी. पण दोन मिनिटे तरी बसावे की पण छे, एका क्षणात डोक्यावर जात असे. आईचे डोके चिमुकल्या दोन्ही हाताने धरून नाजुक दाताने चावायचे. ही किमया आपण बघेपर्यंत हे पोर जणू शिडीवरून उतरल्यासारखे सरकन शेपटीपर्यंत येत असे. मग शेपटीभोवती गोलगोल गिरक्या घेऊन चिमुकल्या पंजात शेपटीच उचलून धरीत असे आणि शेपटीलाच चावा घेत असे. वर अभिमानाने तिरकी मान करून आईकडे बघत असे. हे खेळकर पोर अशा तऱ्हेने चाळे करून तिला खूपच छळत असे. पण शांत, गुणी अपूताई हा प्रेमाचा छळ निमूटपणे सहन करीत असे. हे गुणी पोर ही जर कधी शांत बसले तर मात्र त्याच्या डोळ्यात त्याच्या आईसारखाच केविलवाणा भाव असे. पण शांत बसले तरच नाहीतर.... आईशी खेळता खेळता ते पोर माझ्या पायाला डावल्या मारून पार छातीपर्यंत झेप घेत असे जणू एखाद्या झाडावर रूबाबात चढल्याचा आविर्भाव असे. पुन्हा तिरकी मान करून मलाही प्रेमाने छोट्याशा जिभेने चाटत असे आणि माझ्याकडे लोभसवाणे डोळे करून माझा अंदाज घेत असे की मी रागावले आहे का? इतक्या गोंडस पोरावर कोण बरे रागावेल? मग माझ्या प्रेमाची नजर पाहिली की मात्र त्याला हायसे वाटत असे आणि त्याचक्षणी सरकन खाली उतरून वाऱ्याच्या वेगाने ते बाळ बाहेर जाई पण एका क्षणात नाहीसे होत असे. शोधावे तर ते गवतात लोळत असे. परत तिथेच उड्या मारीत असे. एखाद्या पानाला डावली मारून ते पान दोन्ही हातात वर उचलून धरण्याचा प्रयत्न चालू असे. त्यात बराच वेळ जात असे पण जिद्द कायम असे. शेवटी यश येऊन ते पान माकडा-सारखे हातात धरले जात असे त्याच वेळेस मोठा विजय गाजिवल्याचा भाव चेहऱ्यावर असे. हा प्रकार एका क्षणात आटोपता घेऊन खूप घाईने सराईतपणे एखाद्या झाडावर चढून जात असे. आणि वरून नाजूक आवाजात म्याँव अशा हाका मारून सर्वांचे स्वत:कडे लक्ष वेधीत असे.

आपण बघितल्यावर आपल्याकडे तिरकी मान करून सांगत असे मी बघा एव्हरेस्ट शिखरावर आणि तुम्ही पार पाताळात, आता मात्र त्याच्या आईचा धीर कोसळत असे ती त्याला त्यांच्या भाषेत अगदी कळवळून 'खाली ये' असे सांगत असे पण पोर वरूनच म्याँव म्हणून टाटा करीत असे ह्या त्याच्या बाललीला आम्हालाही सुख, आनंद आणि त्याचे कौतुक वाटत असे. आणि मनात येत असे ह्या बारक्या छकुल्याला कुणाची नजर न लागो. झाडावरून चटकन खाली उडी मारून ते पोर रस्त्यावर धूम ठोकत असे अगदी अनपेक्षितपणे. मग त्याच्यामागे त्याची आई घाबरीघुबरी होऊन पळत असे त्याच्या काळजीने. पण तेवढ्यात जर एखादे कुत्रे त्याला दिसले की मात्र स्वारी पळत पळत आईला गाठून तिच्या कुशीत लपत असे तेव्हा मात्र ती त्याला सरळ घरातच घेऊन येत असे. असे अनेक खेळ, कसरती त्याच्या चालू असावयाच्या. कुठल्याही जागेची त्याला बंदी नव्हती आणि ॲलर्जीसुद्धा. अगदी देवाच्या चौरंगावर जाऊन हातपाय ताणून झोपत असे. तिथली रांगोळी त्याची चार होत असे पण किती एखादे मिनिटच. परत एक झेपेत हा कॉटवर,तिथे मात्र बऱ्याच शतपावल्या करून मनाजोगती एक जागा पकडून मोठ्या मन्यासारखा झोपत असे जणू मगापर्यंत खेळ केलेला 'तो मी नव्हेच' असे अनेक बालीश चाळे चालू असायचे. ते लिहू तेवढे कमीच आहे. त्याच्या बाळलीला बघण्याचे खूप मोठे सुख आम्ही अनुभवले आहे. तो एक वेगळाच आनंद असतो. फक्त बघण्याची दृष्टी हवी आणि आनंद घेण्याचे वेगळे मनही हवे. ही मायलेकरं नेहमी बरोबरच हिंडत असायची. कधी रस्त्यावर, तर कधी झाडाखाली, तर कधी विहिरीवर. शुक्रवारी ही जोडी खूप रात्रीपर्यंत आमच्याकडे होती. शनिवारी बराच वेळ झाला तरी त्यांची प्रभातफेरी झाली नव्हती. कधी कधी उशीर होत असे, पण क्वचितच. तरी ही का बरे अजून आली नाही



Marathi Pratishthan

म्हणून रुखरूख वाटत होती. बाहेर ऊनही वाढले होते तरी ही मी रस्त्यापर्यंत गेले त्यांना शोधण्यासाठी तर भर उन्हात ते पोर खाली निजले होते आणि त्याची आई त्याच्याजवळ बसून होती. दोघेही हाका मारूनही येत नव्हते म्हणून मी तिकडे गेल तर बाळ डोळे उघडे टाकून, तोंड ही हाका मारण्यासाठी उघडलेले होते पण बाळ मात्र देवाकडे गेले होते. त्याची आई दु:खी, उदास होऊन तिथेच रडत होती मूकपणे. हे सर्व अगदी अनपेक्षित होते? कालपर्यंत खाते-पिते पोर एकाएकी कशाने गेले? त्याच्या खाण्यात रात्री काही विषारी आले असावे का? विषारी जनावर चावले असावे का? का हार्टफेल झाला? नुसतेच अनुत्तरीत प्रश्न. बाळ रस्त्यावर उन्हात पडले होते. खूप दु:खी आई ही त्याच्याजवळ होती. बऱ्याच माणसांची तिथून ये-जा झाली होती. हे दृश्य पाहून कुणीही एक क्षणभर थांबले नसावे किंवा कुणालाही अशी इच्छा झाली नाही की ते पोर आणि आई ह्यांना दुसऱ्या चांगल्या जागेत सावली नेऊन ठेवावे. का कुणालाच वेळ नसावा, का कुणाचेच तिकडे लक्ष गेले नसावे, का जाऊनही दुर्लक्ष केले? ह्या प्रश्नांना उत्तरच नव्हते. असेच म्हणावे लागेल.

मी मात्र बाळाला आणि त्याच्या आईलाही आणले. त्याच्या अंगावरची माती, मुंग्या काढून टाकल्या. थोडेसे पाणी तोंडात घातले आणि एका बाजूला झाकून ठेवले पुढील तयारी होईपर्यंत. नंतर खड्डा करून पानांची चादर तयार केली. बाळाला कुंकू, फुले वाहिली. माती नाकातोंडात जाऊ नये म्हणून कोऱ्या पांढऱ्या फडक्याने चेहरा झाकला. अश्रूपूर्ण नयनांनी त्याला प्रणाम केला शेवटचा. मग त्याला खड्ड्यातील पानांवर ठेवले आणि गोंडस बाळाला हुंदके देतच सांगितले, ''छकुल्या तू परत आमच्याकडे. तुझ्या आईकडे ये. आम्ही वाट बघत आहोत.' वरून त्याच्या अंगावर पाने घातली आणि परत नमन केले आणि अगदी शेवटी 'तुझ्या आत्म्याला शांती लाभू दे.'अशी प्रार्थना केली. खूप दु:खी अंत:करणाने हुंदके देतच बाळाला एव्हढ्याशा जीवाला मातीने झाकले. एका क्षणात पोर दिसेनासे झाले. गुणी, रूपवान चिंगुले कायमचे काळाच्या पडद्याआड गेले. आम्हाला दु:खात लोटून. हे सर्व सरावाने चालू होते आणि डोळेही गळत होते. असे बरेच मुके प्राणी आमच्या इथे मातीत गुडूप निजले होते. त्याची क्रियाकर्म आम्ही केली होती. त्याची आई हे सर्व पाहत होती. तिच्या समजण्यापलीकडे सर्व चालले होते. तिच्या दु:खी चेहऱ्याकडे पाहून आमचे हृदय पिळवटले होते. मग गेलेल्या बाळाच्या आईची काय दशा झाली असेल? बाळाचा तो सर्व विधी पूर्ण झाला वर एक फरशी ठेवली दडपण म्हणून, शिवाय त्या फरशीवर बारा-तेरा दिवस दूध आणि पाणी याच्या वाट्या ठेवल्या जाणार होत्या. बाळ उपाशी राहू नये म्हणून पण खरोखरच ते पोरं ते पीत असेल का? देव आणि बाळच जाणे. बाळाला ऊन लागू नये म्हणून वरून छप्परही तयार केले. आपल्या हाती एवढेच होते.

अपूताई हे सर्व भरल्या डोळ्यांनी बघत होती. मूकपणे ती टाहो फोडत होती. आपल्या भाषेत ती बोलू शकत नव्हती आणि तिची भाषा आपल्याला समजत नव्हती. पण भरल्या डोळ्यांनी ती विचारत होती,''माझे पोर का बरे गेले? कुठे गेले? त्याच्याशिवाय मी कशी जगू? मला माझे बाळ परत द्याल का?'' असे अनेक केविलवाणे प्रश्न त्या नजरेत होते. पण माझ्या हाती तिला जवळ घेऊन मूकपणे कुरवाळण्यापलीकडे काहीच नसल्याने ते मात्र मी करीत होते. त्या जीवघेण्या प्रश्नांचे उत्तर माझ्या तोंडात नव्हते.

न खाता-पिता मनू थोडावेळ बसली नंतर ती निघून गेली. पण बाळाला ती शोधत होती. तिचा आर्त स्वर कानावर आला आणि जीव गलबलून गेला. ती दूध पिण्यासाठी बाळाला हाक मारीत होती. एका हाकेत येणारे पोर बऱ्याच हाका मारूनही येत नव्हते एरवी उड्या मारून तिला हैराण करणारे गोजिरवाणे बाळ तिला दिसत नव्हते. त्यामुळे तिचा जीव कासावीस होत होता. जिवाच्या आकांताने ती ओरडत होती त्यातले कारुण्य काळजाला भिडत होते. तिचा आक्रोश पाहून मलाही जेवण गेले नव्हते. बाळ गेलेली आई त्याला उपाशीपोटी टाहो फोडून शोधत होती. पण बाळ कुठूनही येत नव्हते. तिचा शोध चालूच होता. असे किती दिवस ती उपाशी राहील हो. अती भुकेने ती जेवेलसुद्धा पण त्याचवेळी तिच्या नजरेसमोर तिचे बाळ येईल आणि तिचे खाणेही थांबेल. दीड महिन्यापर्यंत बाळ फक्त आईच्या दुधावरच असते मग ते आईचे अनुकरण करते. दूध बशीतून पिऊ लागते. भात खाऊ लागते. ती खात असली तर पोरही त्यातील खाऊ लागते आणि आई बाजूला सरकते. त्याचे खाणे होइपर्यंत. बाळ मात्र खाणे झाले की आईच्या कुशीत शिरून दूध पिण्यात मग्न होत असे. आई मात्र अर्धपोटी राहून त्याला दूध पाजण्यातच सुख मानते. त्याच आईचे एकुलते एक पोर गेल्याने ती किती दु:खी होत असेल ते समजणे अवघड आहे. चार-आठ दिवसांनी ती आक्रोश थांबवेल. खाऊ-पिऊ लागेल. पण ती बाळाला विसरेल का? तिच्या भाषेतील शब्द आपल्याला कळणार नाही. डोळ्यातील भाव नक्की वाचता येतील. डोळ्यांनीच ती विचारेल, ''आहो तुम्ही माझे बाळ पाहिलेत का?' अनुत्तरीत प्रश्न.

पण बुद्धीमान मानव प्राण्याला त्या मुक्या आईचा प्रश्न कळत असेल का? तिच्या समस्या समजावून घेण्यास त्याला गरज आणि वेळ ही नसतो. तो त्याच्याच गुर्मीत आणि टेन्शनमध्ये गुरफटलेला असतो. आपण सोडून दुसऱ्या कुणालाही दु:ख असते ह्याची जाण त्याला नसते. अर्थातच काही अपवाद असतात. पण मनुष्य हे जेव्हा कळेल तेव्हा ती एकांतात एकाकीपणे बसून मूकपणे अश्रू ढाळीत राहील अंतापर्यंत. तेवढेच तिच्या हाती. बाळ गेल्याचे दु:ख का फक्त मानव आईलाच असते का नाही हो सर्व मूक प्राण्यांच्या आईला ही तीव्रतेने हे दु:ख असते. त्यांना ही सर्वभावभावना असतात फक्त ते मानवी भाषेत व्यक्त करू शकत नाही. त्यांना बोली भाषा येत नाही हे एकपरी बरेच आहे नाहीतर माणसांच्या सात पिढ्यांचा उद्धारच झाला असता. वरच्या पित्याने खूप मालमसाला ओतून आई आणि पोर ह्यांच्यातले जिव्हाळ्याचे नाते तयार केले असावे. भरपूर प्रेमाची रेलचेल त्यात केली पण ते इतके अतूट आहे की कुठल्याही धारदार करवतीने कापले जाणारे नसते मग ती मानव आई अथवा प्राणी माता असो. फक्त आईजवळच आपल्या बाळाबद्दल प्रेम, आनंद, जिव्हाळा असतो आणि कारुण्यातील आर्तता.

मनुताई बाळाची वाट पहात बसून राहील,



Marathi Pratishthan

तिला वाटत असेल आपले बाळ खेळून दमून येईल आणि त्याचवेळी ते भुकेले ही असेल मात्र त्याला दूध पाजू तो आनंद दोघंही घेऊ. पण बाळ बरेच दिवस न आल्याने ती किती एकाकी जीवन जगेल आपल्या तान्हुल्यावाचून. त्याला बोलावून म्हणत असेल 'बाळा आता ये रे. डोळ्यात प्राण आणून मी तुझी वाट पाहत आहे. चेष्टा पुरे आता. गळा भेट घ्यायला चिमुकली मिठी मारायला लवकर ये. खूप वाट पाहिली मी तुझी आता ये ना रे बाळा' पण गेलेले परत न येण्यासाठीच जाता ना? पण मनूताईलाा हे कधी कळेल? बिचारी अपूमनू. 'जानेवाले कभी लौटके नही आते। फिरभी हो सके तो आ'

काही महिन्यांनी अपूला दुसरी बाळे होतील. ती ही देखणी, गोंडस. त्याची सुद्धा काही दिवसांनी खेळ, कसरत चालू होईल. आईशी खेळ, तिचे न ऐकणे हे सारे पहिल्या बाळाप्रमाणेच असेल तेव्हा ही त्या आईला आपले गेलेले पहिले बाळ आठवेलच. त्याच्या आठवणींनी ती झुरत राहील अगदी अबोलपणे. कुणाला ती सांगणार? कोण ऐकणार तिचे? आपल्यातच दंग असणाऱ्या माणसांना सांगण्यात काही अर्थ नाही हा अनुभव तिल आलेला असल्याने ती पुढील वाटचाल करू लागेल. त्या बाळांच्या बाललीलेत रंगून जाईल. पहिल्या बाळाचे दु:ख मनाच्या एका कोपऱ्यात सुरक्षित ठेवेल. ती, तिची एकटीचीच कथा आणि व्यथाही असेल.

तरी ही ती देवाला केविलवाणे जाब विचारेल माझे बाळ क्रूरपणे नेऊन तुला काय मिळाले? का आमची जीवघेणी अशी ताटातूट केलीस? तिचे 'का' संपणारच नाही ते अनुत्तरितच राहतील. तिच्याप्रमाणे आपले ही 'का' असेच राहतील. पण ती मात्र देवाला सांगेल अशी कुठल्याही आई बाळांची ताटातूट तू करू नकोस. तू जगतपिता असल्याने तुला आईचे दु:ख कळणार नाही. देवाची प्रतिक्रिया काय असेल? ते देवच जाणे. तिच्या दु:खाने मीही अजूनही दु:खी आहे. मीसुद्धा ते मनातच ठेवले आहे. इतरांना त्यात स्वारस्य नाही ही कल्पना आहे. पण अपवाद असतात म्हणूनच हे लिहून थोडी शांत झाले. माझ्यापरीने साऱ्या मन्यांना, अपूला खाऊ-पिऊ घालून उत्तम सांभाळले. बऱ्याच बाळांना जन्म देऊन वाढवून म्हातारी होऊन तिने हे जग सोडले. तिला, तिच्या बाळांच्या आठवणींनाही माझी डोळे भरून श्रद्धांजली. आमच्याकडे श्वान कार किंवा मांजर वंश खूप संख्येने वाढला. बिनधास्तपणे, मनाप्रमाणे आनंदाने ते जगले कारण आमचे प्रेम आणि भरपूर चांगले खाणे व मार न मिळो ह्याची खात्री असल्याने त्यांनी ही आमच्यावर भरभरून प्रेम केले.

अशा आमच्या सर्व पाळीव प्राण्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. बरेच आले गेले पण आठवणींची स्मृती ठेवून गेले.

**- सौ. नीलिमा विष्णू विद्वांस,**
बदलापूर (पू) जि. ठाणे,
मोबाईल : ९८६०८३४८६१

## 'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात

* * *

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

**पाव पान रु. ६००/-**
**अर्धे पान रु. १,२००/-**
**पूर्ण पान रु. २,५००/-**

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

## सहवास

*क्षण तुझ्या सहवासाचे, रम्य ते सुखाचे*
*आठवता ओठी फुलले, हे बोल अंतरीचे।।*

*रुसता कधी रागाने, दाहक जरी बोल तुझे,*
*कधी हळव्या एकांती, हलकेसे स्पर्श तुझे ।*

*श्वास या श्वासातला, ओळखीचा खास तुझा*
*ध्यास तुझा, आभास तुझा, आठविता सहवास तुझा*
*ओठात या शब्द तुझा, जीवनी विश्वास तुझा*
*क्षण तुझ्या सहवासाचे, हे मंद सुगंधाचे ।।*

*आलीस तू गेलीस तू, सांग कुठे होतीस तू?*
*शोधिता तुजला किती मी, नाही मला दिसलीस तू*

*दूर मी कोठेतरी, शोधितो ग आज तुला*
*जीव माझा खास, तुजविण व्याकुळला !*

*क्षण तुझ्या सहवासाचे, रम्य ते सुखाचे*
*आठवता ओठी फुलले, हे बोल अमृताचे।*

**- विवेक विष्णुपंत विद्वांस,**
बी/११०२, गोल्डन पेटल्स, कर्वेनगर, पुणे ५२,
फोन : ०२०- ६५००४७९९ मोबाईल :९४२२७४१०९५

Marathe Pratishthan

## मराठे कुलमंडळ व आप्तेष्ट यांना नम्र आवाहन

मी उर्वी पेंडसे (मराठे), आपणा सर्वांना एक नम्र आवाहन करते आहे.

ते असे की, आपणा सर्वांना हे माहिती असेलच, की मराठे कुलापैकी काही कुटुंबाची देवी श्री भावई देवी, कोचरे (कुडाळ) जि. सिंधुदुर्ग ही आहे. ही देवी व आजूबाजूचा परिसर बराच पुरातन असून सदरची मूर्तीही सुमारे ६०० वर्षांची जुनी असावी. शालिवाहन शके १३१७ मध्ये चालुक्य राजांनी कोचरे येथे पाच घराण्यांना उपजीविकेसाठी जमीन (वृत्ती) दिल्याची नोंद सापडते, ती घराणी पेंडसे, सिधये, करंदीकर, मराठे व नातू हा उल्लेख आहे. त्याच सुमारास श्री भावई देवीची स्थापना कोचरे गावी झाली असण्याची शक्यता आहे. वरील सर्व पाच घराणी या देवीला ग्राम देवता व कुलदेवताही मानतात. या देवीची पूजा, अभिषेक इ. गोष्टी आपल्या कुलाचारामध्ये समाविष्ट करून घेतल्या आहेत. सदरची मूर्ती वातावरण पूजा, अभिषेक इ. उपचारामुळे तिची झीज झालेली आहे. झिजलेल्या मूर्तीची पूजा करू नये असे शास्त्रात सांगितले आहे. त्यामुळे नवीन मूर्ती तयार करण्याचा निर्णय श्री भावई देवी पुन: प्रतिष्ठान समिती स्थापून नवीन मूर्ती तयार करून बसवावयचा निर्णय घेतला आहे. दिनांक २ मे २०१३ रोजी नवीन मूर्तीची स्थापना शास्त्रोक्त विधीपूर्वक केली जाणार आहे.

पेंडसे, नातू, करंदीकर, मराठे आणि सिधये अशा पाच घराण्यांना कोचिरे गावी चालुक्य घराण्यातील राजांनी प्रजापती संवत्सर शके १३१८ मध्ये वैशाख सोमवती अमावस्या या दिवशी २४ वृत्ती (उपजीविकेसाठी दिलेली जमीन) दिल्याचा ऐतिहासिक कागदपत्रात उल्लेख आहे. या वतनांमुळे वरील पाच घराण्यांची वस्ती कोचरे या गावी दीर्घकाळ होती. त्यामुळे तेथील श्री भावई देवी (भावेश्वरी) हे या पाचही घराण्यांचे श्रद्धास्थान होते व आहे.

या भावेश्वरी देवीची काळ्या पाषाणातील मूर्ती शेकडो वर्षांपूर्वीची असून ती पूजा अभिषेक ह्यामुळे झिजून गेलेली आहे. म्हणून वरील घराण्याच्या काही व्यक्तींनी एकत्र येऊन या मूर्तीचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प केला. जीर्णोद्धारासाठी त्या देवीचा कौल व तेथील ग्रामस्थांची मान्यता ही घेण्यात आली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी श्री. अनंत भास्कर पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली 'श्री भावईदेवी (कोचरे) जीर्णोद्धार समिती' स्थापन करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे दोन ते सव्वादोन लाख रुपये खर्च येणार असून निधीसाठी पाचही घराण्यातील कोचरे मूळ स्थान असलेल्या व्यक्तींना आवाहन केलेले आहेच.

तरी आपल्या कुलमंडळाकडून या जीर्णोद्धार प्रकल्पासाठी शक्य ती देणगी मिळावी अशी आपल्या कुलमंडळाला विनंती आहे.

देणगीचा धनादेश 'करंदीकर प्रतिष्ठान' या नावाने मिळावा तो 'करंदीकर प्रतिष्ठान, ६ अमित कॉम्प्लेक्स, ७४७ ब, सदाशिव पेठ, न्यू सदाशिव स्कूलसमोर, टिळक रोड पुणे ४११०३०.या पत्त्यावर पाठवावा. किंवा देणगीची रक्कम 'करंदीकर प्रतिष्ठान' च्या खाते क्र. २००५७१५८७७८ , बँक ऑफ महाराष्ट्र, टिळक रोड शाखा,पुणे खात्यात जमा करून खालील कोणत्याही व्यक्तीस भ्रमणध्वनीवर कळवावे, (बँकेचा आयएसएफसी कोड MAHB0000041 असा आहे) देणगीची रितसर पावती पाठवली जाईलच. (देणगीला करंदीकर ट्रस्टच्या माध्यमातून ८०-सी अंतर्गत आयकर सवलत मिळू शकेल.)

समिती सदस्य : १. डॉ. विश्वास सिधये ०९८२३३८८४०५ २. किशोर करंदीकर ०९४२२०८५५९०
३. अनिल पेंडसे ०९८२२६५८१७८ ४. वासुदेव पेंडसे ०९७६३०१७१७३

**- प्रकाश पेंडसे, जीर्णोद्धार प्रकल्प समन्वय समिती**

## वाचकांचा पत्रव्यवहार

माझा वर्गणीदार क्रमांक ९९५२ आहे. मजकडे येणाऱ्या हितगुजच्या रॅपरवर हा क्रमांक असतो.

मी मराठे नाही, माझी आई करंदीकर होती, पती चितळे होती, सून जोशी आहे, माझे जावई मराठे नाहीत. तरीही मी हितगुजचा सभासद आहे ते मुलुंडच्या सुयोग गृहसंस्थेतील लक्ष्मणराव मराठे यांच्यामुळे. त्यांनी प्रेमाने माझे नाव वर्गणीदारांच्या यादीत घातले. नंतरच्या संपादकांनीही माझे नाव कमी केले नाही.

मी हितगुज वाचतो. तो वाचनीय असतो. त्याहीपेक्षा, मराठे मंडळी एकत्र येतात, हितगुज चालवतात याचे मला कौतुक वाटते, नव्हे मराठ्यांविषयी मला आदरच वाटतो. आपले रमाकांत विद्वांस हे तर माझे १९५५-५८ या काळातील वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजातील मित्रच आहेत. अरेतुरेतील मित्र आहेत. तात्पर्य, हितगुजकरिता रु. २०००/- पाठवण्याचा मला, मी मराठे नाही तरीही, हक्क आहे असे मी समजतो. सोबत रु. २०००/- चा चेक जोडत आहे.

ता.क. : काही कारणामुळे हितगुज बंद करायचे ठरले तरीही माझे पैसे परत करू नयेत. प्रतिष्ठानकडे देणगी म्हणून वळवावेत.

- भा. ल. महाबळ, ए-६०१, साईनाथ अपार्टमेंट, युनियन बँकेजवळ, टाटा कॉलनी, नवघर रोड, मुलुंड (पू.) फोन : ०२२-२१६३१९४०

Marathe Pratishthan

## सहवेदना

**सौ. सुधा श्रीपाद मराठे** (पृ.५३८). पूर्वाश्रमीची सुधा राजाराम सोहोनी. जन्म : २६-९-१९४२ इंदौर. मध्यप्रदेश, आजोळी घारपुरे यांचेकडे. विवाह : २१-६-१९६१ रोजी हिंडलगा येथे श्रीपाद नारायण मराठे, बेळगाव यांचेशी. मृत्यू. ७-९-२०१२. कोल्हापूर



त्यांचे प्राथमिक शिक्षण हिंडलगा, बेळगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण वनिता विद्यालय हायस्कूल, बेळगाव येथे झाले. १९६०-६१ मध्ये टेलरिंगचा डिप्लोमा घेतला. विवाहानंतर कर्नाटक युनिव्हर्सिटीचा टीचर्स डिप्लोमा टी. डी. १९६७ मध्ये व शिवाजी विश्वविद्यालयाची प्री डिग्री प्रथमवर्ष १९६९ मध्ये पास झाल्या.

त्यांना दोन मुली, जयश्री १९६२ व वंदना १९६५. त्यांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणावर जातीने लक्ष दिले.

लग्न झाले तेव्हा आम्ही धरून आठ माणसे घरात होती. आर्थिक ओढाताण कायमच असायची. कोणतीही हौस-मौज करता आली नाही. पण सुधाने कधी नाखुषी दाखवली नाही. त्यावेळी त्यांचे वय १८ वर्षे होते.

त्यांचे आर्थिक नियोजन अचूक व काटेकोर होते. स्त्रिया व लहान मुलांचे कपडे शिवण्यात त्या निष्णात होत्या. त्यातून थोडी आर्थिक कमाई होत होती. १९८९ ते २००५ अशी पंधरा वर्षे अल्पबचत एजंट म्हणून कार्य करून त्यांनी बऱ्यापैकी कमाई केली. त्यामुळे घरात सुबत्ता आली. दूरदर्शीपणाने त्यांनी १९६९ साली घरासाठी प्लॉट खरेदी केला होता. त्यांनी केलेल्या गुंतवणुकींतून १९९५ साली फ्लॅट खरेदी केला. मालकीच्या घरात राहता आले याचे समाधान लाभले.

सामाजिक बांधिलकीतून त्यांनी पित्याच्या मालमत्तेवरचा हक्क बंधूंना सोडून दिला. पाळी (गोवा) येथील माझ्या नावची नारळीची बाग आम्ही भावाच्या नावे मोफत करून दिली.

समाजातील दुर्बल घटकांसाठी, त्यांनी शिक्षणदान व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना सुमारे पंच्याहत्तर हजार रूपयांपर्यंत मदत दिली आहे.

दांभिकपणाचा त्यांना राग येई. तसे त्या सडेतोडपणे बोलून जात. नातेवाईक किंवा कोणाचीही प्रगती पाहून त्या सुखावत असत. दीर-नणंदांची शिक्षण व लग्ने,तसेच स्वत:च्या मुलींची लग्ने, पतीच्या निवृत्तीपूर्वी करायची ही कामे सुनियोजितपणे केली. मृत्यूपूर्वी नऊ वर्षे रजिस्टर्ड इच्छापत्र करून मालमत्तेची व्यवस्था लावली होती. त्यांनी मरणोत्तर देहदान केले. मृत्यूपूर्वी १६वर्षे त्यांनी संधिवाताशी प्रखर झुंज दिली. त्या झुंजीत त्या अखेर हरल्या. त्यांनी विषम परिस्थितीत आदर्श संसार केला.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती व सद्‌गति देवो ही प्रार्थना.

कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे यांच्या स्मरणार्थ हितगुजला जाहिरात दिल्याबद्दल आणि रु.१०,०००/- बिनव्याजी ठेव दिल्याबद्दल मराठे प्रतिष्ठान मराठे कुटुंबियांचे आभारी आहे. धन्यवाद! मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

प्रेषक - श्रीपाद नारायण मराठे, सौ. जयश्री ऊर्फ गौरी सदाशिव परांजपे,गारगोटी.


**- सौ. वंदना ऊर्फ प्रियंका प्रकाश कुलकर्णी,**
५३०/१/१०,बी-२, तारा टेरेसेस, सम्राटनगर, कोल्हापूर ४१६००८
फोन- (०२३१) २६९३३४१ मोबाईल : ९४८०५६६०९१


## गोविंदा आला रे आला

जय देवा जय देवा बालमुकुंदा
स्वागत करितो तुझें अष्टमिला
श्रावणातल्या जमल्या घननिळा
वर्षाव होऊदे नित्य धरतीला
कंसाच्या कारागृहीं जन्म हा झाला
वसुदेव देवकीपोटी पुत्र जन्मला
ऐसा परमेश्वर कधी नाही झाला
बालपणी तुम्हीं कैक लीला केल्या
गुराख्यांसाठी पर्वत उचलीला
दंशफणी नागाला यमी धाडिला
महाभारती सारथी केले काम
अर्जुना दाविले नि:कर्म मन
नित्य जगी असतो तुझा वास
तुझ्या भेटीलागी लागो सदा आस.
संत मिराबाई वेडीपिशी झाली
तुझ्याच सेवेने तृप्त पावन झाली
पुरविशी देवा सर्वांच्या कामना
अंतरात असू दे प्रेमळ भावना
नाही तुला आदी आणि अंत
सारेच जग झाले अनंत आनंत
किती नावे तुला बाल गोविंदा
जीभ अडखळे मुकुंदा गोपाळा
तुला नाही कधी अशक्य
अशक्याचे करीशी नित्य शक्य
द्वारकेचा राजा राज्य द्वारका
लोक पाहती टकमका टकमका
पुत्र व्हावा ऐसा ज्याचा झेंडा
तिन्ही लोकी लागे उदंडा
दोन्ही कर जोडो तुझ्या नंदा
हिच विनंती माझी रे गोविंदा


**- गोविंद नारायण मराठे (पृ.५४१)**
तिस्का, उसगाव, गोवा





Marathe Pratishthan

## RAJEEV WAMANRAO MARATHE - by Sushil Keshavrao Marathe (page 240)

Born on 13 January 1967, at Chhindawara (M.P.) my first Rajeev is a person of multiple paths. On one hand he has an excellent academic & professional profile whereas on other hand he has exhibited an illustrious proficiency in Indian Music as a vocalist.

His Music journey started with an casual entry in nearby music school run by Shri Desai in Gwalior, and then in Maharudra Mandal Sangeet Vidyalaya in the nearby vicinity of his home. The basics of Hindustani vocal music were imbibed in him through expert an dedicated tutelage of Shri Desai & Smt. Kumud Godbole. Soon at the tender age of 10 yrs in 1977 due to chnage in residence, Rajeev found his ultimate guru in Dr. Arun Bangre, the founder Principal of Ravindra Sangeet Vidyalaya and the disciple of Pt. Balasaheb Poonchwale of Gwalior Gharana. He took special training of Khayal gayaki under the expert tutelage & guidance of Dr. Bangre for 12 yrs till 1989. During the same period he obtained the degree of 'Sangeet Prabhakar' from Prayag Sangeet Samiti, Allahabad in 1981. By now the liking for classical musice in him had turned into a passion. The traces of musical genes in him could be traced back to his grandfather Shri Ramchandra Marathe, who was an accomplished harmonium player.

In parallel, he was going extremely well in academics too. Studied in A.M.I. Shishu Mandir (where his mother Smt. Pushpa Marathe also taught Hindi & Mathematics) and later in Miss Hills School, Gwalior. When he completed his schooling, there came a big dilemma over which path to be chosen for career- Engineering or Music? His brother Sanjeev Wamanrao Marathe eqully exhibited strong and coviction to pursure engineering and B.E. in Electronics.

However with a strong sense of self-belief, die to equal liking towards music amd academics, he exhibited a strong conviction to pursue engineering as well as music with same passion & vigor. He obtained degree of B. Music (Vocal) from Indira Kala Vishvavidyalaya, Khairagarh (then in Madya Pradesh) in 1987 and B.E. (Electronics) from Madhav Institute of Technology & Science, Gwalior in Electronics discipline (Jiwaji Universit, Gwalior) in 1988. Due to constant motivation from his father, Shri Wamanrao Ramchandra Marathe & mother Smt. Pushpa Marathe he could strike a fine balance in pursuing the both streams.

After serving with Philips India, Ltd. Mumabi for a brief period of 2 and half years, he joined Defense Research & Development Organization (DRDO), Ministry of Defense, Govt. of India in February 1991. Since then he is working as defense scientist in Instruments Research & Development Establishmet (IRDE), Dehardun.

In his professional field he has excelled thoughout his carrier and now is working as Joint Director. He also obtained his masters (Master of Technology, Control Systems) from the prestigious IIT Kanpur ins 1997. He also bagge DRDO Young Scientist of the Year award in the year 2000 and many more group technology awards for developin new technologies and devices for defense applications. He has travelled extensively in different countries for different joint development programs. He has to his credit many technical papers in reputed international of and national journals. He is also on the review panel for Optical Engineering Journal of SPIE (International Society of Optics & Photonics). He has also presented research papers in International & National Conferences. He works in the area of Platform Stabilization (intertial), robust control algorithms, fuzzy controllers and neural networks.

In parallel, in the field of music too, he became disciple of Pt. Vasudevrao Deshpande of Agra Gharana for a brief period of 3 yrs. He won first prize in All India Classical Vocal Competition at BITS Pilani and participated in prestigious Yuva Sangeet & Nirtiya Mahotsava organized by South Central Zone Cultural Centre, Ministry of Human Resources Development and Govt. of India in Tirupati & Nagpur. He has given many solo performances in many cities like Gwalior, Jhansi, Ujjain, Katni, Mumbai, Pune, Dehardun, Rishikesh, Haridwar, Lakhimpur, Kanpur etc. He has awareded Doon Ratna Puraskar by Sanskar Tere du-ciel, France in their prestigious Indian Music Festival. Stalwarts like Pt. Hari Prasad Chaurasia also participated in this festival.

Apart from concerts he has penned many articles on Musicm in



Marathe Pratishthan

which a seriess of articles called as Dhwani mudrkaon ka Rasaswadan is worth mentioning. He has also composed many compositions (Bandishes) in different ragas & talas. He has also created a new Raga 'Arun' named after his guru which received rave reviews and comments from different musicians and critics.

While in IIT, he also developed a back propagating neural network which was successfully trained to identif the suitable time for a raga rendition according to time theory of Hindustani Music. This project was highly acclaimed by many.

His wife Mrudula Marathe is also an accomplished Kathak dancer and is working as a music & dance teacher in Touchwood School at Dehardun. She also gives regular performances in light music genre and also has choreographed many dances and ballets on different occasions for different institutions. Needless to say, she acts as a fine constructive critic for his musical endeavors. His daughters Ojaswini & Swarmayee are also talented in their respective fields of English Literature and Kathak dance.

Rajeev and Mrudula have cut two albums viz. "Bhagwan Mere Adhar Tumhi Ho" (Hindi Bhajans and 'Mere Ek Sapne Me' (Hindi romantic Melodies) and an album on Marathi Abhangas is to be released shortly.

As the DRDO job is becoming more and demanding now, with higher responsibilities, it is extremely challenging to cope up with both the fronts - technical & music. However, Rajeev is efficiently working hard on both fronts and excelling in both the fields, which is indeed a matter of proud for the family. We as a family wish him a great success in all his endeavors.


- **सुशील केशवराव मराठे,**
(पृ. २४०)
फ्लॅट नं. ६०४/बी-१, हाईडपार्क गॅलेक्सी,
सी.एच.एस. ऑफ घोडबंदर, चितळसर,
मानपाडा, तुलसीधामजवळ, ठाणे (प.).
४००६१० मोबाईल : ०९६१९९३०३५३


# ENGLISH -ENGLISH

*We'll begin with a box, and the plural is boxes,*
*But the plural of ox becomes oxen, not oxes;*
*One fowl is a goose, but two are called geese,*
*Yet the plural of moose should never be meese;*
*You may find a lone mouse or a nest full of mice,*
*Yet the plural of house is houses, not hice.*

*If the plural of man is always called men,*
*Why shouldn't the plural of pan be called pen ?*
*If I speak of my foot and show you my feet,*
*And I give you a boot, would a pair be called beet ?*
*If one is a tooth and a whole set are teeth,*
*Why shouldn't the plural of booth be called beeth ?*

*Then one may be that, & three would be those,*
*Yet hat in the plural would never be hose;*
*And the plural of cat is cats, not cose.*
*We speak of a brother & also of brethren,*
*But though we say mother, we never say methren.*
*Then the masculine pronouns are he, his & him,*
*But imagine the feminine: she, shis & shim !*

*Let's face it - English is a crazy language.*
*There is no egg in eggplant nor ham in hamburger;*
*Neither apple nor pine in pineapple.*
*English muffins weren't invented in England .*

*We take English for granted,*
*but if we explore its paradoxes,*
*We find that quicksand can work slowly,*
*boxing rings are square;*
*A guinea pig is neither from Guinea nor is it a pig.*
*Why is it that writers write, but fingers don't fing,*
*Grocers don't groce & hammers don't ham ?*

*If teachers taught, why didn't preachers praught ?*
*If a vegetarian eats vegetables,*
*what does a humanitarian eat ?*

*Sometimes I think all people who speak English*
*Should be in an asylum for the verbally insane.*
*In what other language do people recite at a play,*
*and play at a recital ?*

*We ship by truck but send cargo by ship ...*
*We have noses that run & feet that smell;*
*We park in a driveway & drive in a parkway.*
*And how can a slim chance & a fat chance be the same,*
*while a wise man & a wise guy are opposites ?*

*You have to marvel at the unique lunacy of a language*
*in which your house can burn up as it burns down;*
*In which you fill in a form by filling it out,*
**& in which an alarm goes off by going on.**

*If Father is Pop ....*
*how come Mother's not Mop ? ? ? ?*


- **रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**
३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड,
माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०





Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 4

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

## 'MY LEARNING GROUND - THE HCC

During my stint with Tata Power, Tunnel excavation at Dongarwadi went on till June 1962. There was a lot to learn when tunnel excavation was going on. Thereafter, when installation of concrete lining of the tunnel started, there was nothing much to learn as It was a repeated run of the mill job. I therefore decided to seek a change.

I joined The Hindustan Construction Co. Ltd. [HCC] in September 1962. Pioneering industrialist Late Seth Walchand Hirachand who was a great visionary, started his construction organization by taking up the contract for construction of the Barsi Light Railway. In due course of time, his construction organization developed into HCC. Late Seth Walchand was a person with immense foresight. Around 1920's he along with Late Seth Narottam Morarjee went out to set up one of the oldest Indian shipping companies – Scindia Steam Navigation Co. Ltd. In the year 1941, this was followed by setting up of India's first ship-building and repair facility – Scindia Shipyard which is now known as Hindustan Shipyard Ltd. Late Seth Walchand also set India's first organization for manufacture and repairs of military aircrafts at Bangalore and named it as Hindustan Aeronautics Ltd. This culture of 'Firsts' also trickled into HCC.

India's first Undersea Oil Pipeline from Butcher Island to on-shore storage facility in Mumbai was laid by HCC with technical know-how from Merritt Chapman of England.

India's first Concrete Dam which came up across River Vaitarna in Maharashtra was constructed by HCC. This was probably the first project in India where a Cableway and Chilling Plant for cooling of sand and aggregates. A Cableway comprises of a set of cables spanning across a river valley where a dam is under construction. It is used for picking up concrete and other materials from the river bank and lower them down to the spots underneath. For concreting of critical structures, during periods of high temperature, cooled sand and aggregates concrete are used in concrete to lower the heat generated during the process of hydration to prevent development of concrete.

Koyna Hydroelectric Project of Maharashtra was the first project with an underground power generation facility. The facility was constructed by HCC. For construction of inclined pressure shafts, HCC had imported Alimak Raise Climbers, which were used probably for the first time in India. For easier and faster construction, steeply inclined tunnels are many a times excavated bottom upwards. These climbers which are in the form of foldable platforms and backup trolleys, moving on specially designed rail assemblies fixed at the crown of the tunnel, provide access to the advancing tunnel face for drilling and blasting etc. After each blast, the blasted muck automatically rolls down to the bottom and the access platform is moved up to commence face drilling simultaneously with mucking.

HCC constructed the first concrete arch dam for the Idukki Hydroelectric Project in Kerala. Concrete poured in arch dams needs post-cooling for a period of about a month for prevention of development of micro-cracks. For the purpose of post-cooling, a network of pipes is placed in the concrete being poured and chilled brine is circulated through the pipes, in a controlled manner, to absorb the heat generated due to hydration.

India's first Underground Metro was constructed in Calcutta. Though, most of the route was below existing roads, two sections, each about 400 m. long near Chitpur Yard and Belgachia Tram Depot had to be located below existing old, thickly, populated buildings. For this work, the required compressed air shield had been procured by Calcutta Metrorail from Russia. This was probably the first time compressed air shield was used for tunnelling in India. HCC won the tender and became a pioneer in the field.

HCC also constructed about 10 km. length of the Calcutta Metro under the road leading from Chowrangee to Shyam Bazaar by Cut & Cover Method. This section of the road had very heavy traffic and with old populated buildings on both sides. Traffic was therefore made to move on temporary decks supported on diaphragm walls and braced piles while construction went on underneath with the use of low-headroom earthmoving equipment with the help of Japanese Joint Venture Partners.

India's first Pumped Storage Hydroelectric Project came up at Kadamparai in Tamilnadu. Underground Power Station was constructed by HCC.

Marathe Pratishthan

Diversion Dam, Water Conductor System and the Underground Power Station for the Yamuna Hydroelectric Project, Stage II Part 1 was constructed by HCC. In a 90 m. stretch of the 6 km. long Head Race Tunnel, excavated periphery that was under high stress used to dilate immediately after each blast causing rock falls. The only solution wasuse of Sprayed Concrete i.e. Shotcrete. This was the first time Shotcrete was used in India. HCC successfully tackled the problem by importing technicians and equipment from Europe.

In addition to all these 'Firsts', HCC has completed many prestigious projects and has its presence in Dams, Bridges, Harbours, Nuclear, Thermal and Hydro Power Stations, Tunnels, Roads and Infrastructure Projects.

I was fortunate enough to be associated with all the 'Firsts' except the Undersea Oil Pipe Line and Vaitarna Dam which were completed before I joined HCC.

HCC was a professionally managed organization led by proficient management and erudite executives. Engineers and staff were highly motivated and efficient. Engineers were treated like officers and were given lot of respect. Management even went out of wayto help them in solving their personal problems. Merit was duly recognized and adequately compensated. All this created a deep sense of belonging and everyone was proud to identify himself with HCC

Engineers who would keep their eyes and ears open got lot of opportunities for advancement. Negligence was never pardoned. Mistakes committed out of ignorance were tolerated and guidance was given for correction.

In 1966, I was posted at the Head Office of HCC in Mumbai to assist my boss in monitoring of existing underground works and tendering for new works. My boss knew that before coming to Mumbai, my project site boss had trained me in planning and preparation of tenders for new works. He therefore asked me to prepare a tender for a small tunnel project and warned me that I will have to satisfactorily answer all his queries. This was my test. After my boss studied all the documentation I had prepared, he called me and told me that he had no queries as everything was clearly set out. This opened the doors for me and I started handling bigger and bigger tenders.

I learnt design of Drilling and Blasting Patterns from my cousin who was a mining engineer from UK was in charge of Sales of Construction Equipment with a multinational organization. He also gave me deep insight into various available construction plants from world over, including their comparative performance characteristics and special aspects.

While in service with HCC, in 1970, I completer a three year part-time course in Business Management leading to Post-graduate Diploma in Business Management from Jamnalal Bajaj Institute of Management Studies of Mumbai University. This gave me an insight into Financial Planning, Laws of Contracts and Commercial Laws. Thereafter, the work of preparation of claims and arbitration was added to my portfolio. I used to prepare my own notes with remarks on the contract documents and contract correspondence. These note and my participation was appreciated by our lawyers and a very senior barrister even wrote to HCC that he found my assistance very helpful and that I had quite good knowledge regarding contract and commercial laws.

In 1977, HCC decided to quote for the Calcutta Metro Shield Tunnel Work by forming a technical joint venture with the Hungarians. I was a member of the team for carrying out negotiations. Because of my techno-legal background, I got an opportunity to draft the Joint-venture Agreement. The agreement was so much appreciated by my bosses that thereafter I was involved in all the Joint-venture formations.

By early 80's HCC decided to bring in external advisors for introducing new management concepts and standardization. Because of standardization, special recognition of merit and efficiency were almost given a go-bye. This demoralized efficient engineers and there was a loss of sense of belonging and HCC slowly started slipping from its top position in the construction industry. This resulted in an exodus by mid 80's,

By then I had gained valuable experience in many fields and I decided to start my own practice as an Engineering and Management Consultant. I left HCC with a heavy heart after a service of about 23 years but my cordial relations with my former bosses and colleagues continued.

In the recent years, HCC has started regaining its position under the strong leadership of Shri. Ajit Gulabchand.

So rich is the background of my Engineering and Professional Alma Mater which was my real learning ground. I kept my eyes and ears open, boldly accepted challenges and strived to make best out of all the opportunities I got and ingeniously used them for my advancement.

It is said that behind every successful man there is a woman. This saying is all the more true in case of construction industry. Families of persons working on projects in remote areas are deprived of family life. If they stay at site, they have to be away from their school going children. If ladies stay with the



Marathe Pratishthan

children they have to be away from the husbands.

The industry is highly competit-iveand everyone has to work for long hours. At site the work goes on round the clock and engineers are at work from early morning till late evening. General routine of the ladies at the site is to finish cooking and then meet for gossiping, have a nap after lunch, go for a stroll in the evening and then wait for the husbands to return from work. This is easier said than done as this is the routine for all their life. However it is really commendable as the husband is always received at home with a smile.

**Therefore, whatever I am today, I owe it to HCC and to my lovely wife Shubha.**

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**
३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

*ट्रेकिंग हा धाडसी, हौशी खेळ, पण कधी कधी अति धाडस अंगाशी येण्याची शक्यता असते. अशा वेळी वाचवतं ते आपले नशीब आणि नशीबापेक्षाही निसर्ग... हो ना... त्याची साथ नसेल तर... पुरंदर किल्ल्यावरील ट्रेकिंगच्या दरम्यान अचानक जमीन खचली आणि...*

# जमीन खचली पण...



१३ जुलै २००९... फ्रेंडस ट्रेकिंग ग्रुपतर्फे आम्ही २५ जणांचा ग्रुप पुरंदर-वज्रगड सर करायला निघालो... एकमुखी दत्ताचे गाव... म्हणजे नारायणपूर...साधारण सहा-सात तासांच्या प्रवासानंतर आम्ही तिथे पोहोचलो... बसमध्ये झोप चांगली मिळाली होती... पावसामुळे वातावरणात चांगला गारवा होता... पाण्यात हात घालवत नव्हता एवढे थंड होते. तरीही पाण्यात हात घालावा लागला... हाताला कापरे भरले, वात हातात शिरला... शेवटी मग जरासा वॉर्म अप...हात झटकल्यानंतर वात गेला... मग एका टपरीवर गरम गरम चहा झाला. थंडीवरचा गावठी उपाय.

आमच्या ग्रुपचे नेतृत्त्व अरुणकडे होते. रवी आणि हेमंतने पिछाडी सांभाळली... पुरंदर चढायला सुरुवात करतानाच पावसाची हजेरी झाली. साधारण सकाळचे आठ-नऊ वाजले असतील. इथल्या चर्चपर्यंत पोहोचल्यावर पावसाने चांगलाच जोर धरला. थांबण्याशिवाय पर्याय नव्हता. साधारण २० ते २५ मिनिटे पावसाने वाया घालवली. पाऊस थांबला आणि आम्ही निघालो...

अरुण आणि निधी अधिक पुढे पुढे निघाली. रवी आणि हेमंत मागे होते. मी मात्र मध्येच एकटा होतो. पुढचे पुढे गेलेले आणि मागचे बरेच लांब राहिलेले. मी एकटाच... आणि वाट सापडेनाशी झाली. वेडे धाडस करण्यात अर्थ नव्हता. मी सरळ परतीची वाट धरली. म्हणजे मागून येणारे तरी भेटतील. पायवाटेने हळूहळू मागे आलो. थोडंसं अंतर गेलो आणि रवी, हेमंत भेटले... जीवात जीव आला. हायसे वाटले तोच... धडाड्...सरसर... धाड मोठ्ठा आवाज झाला. पुढे एनसीसीचा ग्रुप गेलेला. त्यामुळे कवायतीचा काही प्रकार असावा असे वाटले. रवी, हेमंत दोघांबरोबर मी परत पुढे निघालो... आणि धक्काच बसला. पाहिले तर मी ज्या पायवाटेवरून मागे परतलो ती पायवाट साफ नाहीशी झाली होती. त्यावरची जमीन खचली होती आणि अख्खा मातीचा कडा त्यावर कोसळला होता. दोन-चार झाडेही त्याबरोबर खाली आली होती... सगळीकडे चिखल झालेला. पुढे पाऊल टाकलं आणि लक्षात आलं...काही सेकंदापूर्वी आपण येथूनच पार झालो. काळ आला होता पण वेळ चुकली होती... मी तिथे असतो तर माझीही पायवाट झाली असती. पण नशिबाने साथ दिली आणि निसर्गाने हात दिला.

तो चिखल तुडवत,निसर्गाचे देवाचे आभार मानत मी पुरंदर गाठला. उतरताना अरुणसह सहकाऱ्यांना तो स्पॉट दाखवला. सगळेच अवाक् झाले. निसर्गाने तशी शिकवण दिली. ट्रेकिंग एकट्या दुकट्याने करू नये. ग्रुपला सोडून जाऊ नये ही शिकवण मनात ठेवूनच आम्ही वज्रमाळेकडे निघालो...

साभार 'सामाना' दि.१२ जानेवारी, २०१३

-श्री. **निरंजन प्रभाकर मराठे**, (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०००३१, फोन नं. : ९८२०७३४८८४



Marathe Pratishthan

# A Wonderful Person : Sudha Murty

- Shymala Purandare

Sudha Kulkarni (Murty) is an M.Tech in Computer Science. She teaches the same subject to Post Graduate students. She is the Chair-person of the Infosys Foundation, Though a prolific writer in Kannada, sha has written an excellent English Book 'Wise and Otherwise' whichhas been translated into 13 Indian Languages. This book is dedicated to small children who are the citizens of tomorrow and are expected to bring good changes in our dear country. Here are some good events taken from her the beautifully written book 'How I Taught My Grandmother To read and other stories'

As a small village girl, she was told countless stories by her scholar grandpa. These wonderful stories had guided her throughout her life Great!

The first story throws light an the strong willpower of small Sudha's intelligent, loving grandma who learnt to read her past sixty. This so called old lady touched the feet of the young teacher and gifted her a Frock material as a Guru Dakshina, The small Guru returned the gift in the form of her favourate novel. What a marvellous bonding between the Guru and the Disciple!!!

This story reflects the difference between today's nuclear family with that of the joint family. Arrival of T.V. and other modern gadgets have removed the power of imagination of the young generation. Again there is no affective bonding with the elder people. Absense of an expert storyteller is equated to the loss of direct experience of different emotions of young minds such as horror, surprise, humair,

Another story tells the readers about the expresident honorary Shri, Abdul Kalam who was the principal scientific secretory to the Govt. of India. He has achieved his position only on the basis of his merit, He has a compassionate heart which lovesll children.Our autor was invited to his swearing in ceremony in the Central Hall of the parliament. This place was filled with kids, teachers, family members, scientist and ordinary middle class people. What an amazing scence to watch at indead!

'Appro J.R.D.' is very interesting. Appro means ours in Gujarati language, Sudhadidi met him in 'Bombay House' for the first time and Bharatrantna J.R.D. became a role model to her on account of his simplicity, generosity, the care he took of his employees and his kindness. She was a young, bright, bold and an idealistic Engineer who came through an advertisement, from TELCO stating, 'Lady Canddidates need not apply'. She was very upset with this gender discrimination and expressed her anger on a postcard. But after meeting J.R.D. personally, she came to know about his rare qualities. His impact on her mind is so intense that she has his photograph in her office Starting her day by showing her gratitude to this real human being.

'A Wedding in Russia' informs us about an unique custom in Russia. Any wedding takes place normally either on a Saturday or a Sunday. Irrespective of the season after signing the register at the marriage officem the married couples must visit the important national monuments near by Everday in this country, has to serve in the military at least or a couple of years. Regardless of his position, he has to wear his service uniform for this function as a mark of gratitude. This is because the forefathers had given their lives in various wars their beloved country had faught. So the newly married boy and girl opt for their blessings. Love for the country is more precious than marriage celebrations. Isn't it a lesson we, Indians have to learn who have extravagant wedding celebrations?

In short, this back is a delightful collection of short stories. They recount real life incidents from the honest life of Sudha Murty. Every sentence of this 133 page book is worth reading. She is a loving grand daughter an affectionate daughter, a co-operative wife, a dutiful mom, a great teacher, a true friend, a sincere social worker and the best selling writer.

We are very proud of you Sudhatai

We wish thousands of such Sudha to be born in our country.

- **Shyamla Purandare (पु.७५५),**
27 B, Vrindavan Society, Panchavati,
Pashan, Pune 411 008
Mobile : 9403625724
Phone : 020-25898534

Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

हितगुजच्या ताज्या अंकात हितगुजच्या भवितव्याबद्दल व्यक्त केलेली चिंता खरोखरच चिंतनीय आहे. सद्य परिस्थितीत अंक व त्याकरिता लागणारा खर्च हा दिवसेंदिवस वाढतच जाणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे वर्गणीत वाढ करणे अपरिहार्य ठरेल. त्यावरचा नेमका उपाय तज्ज्ञ मंडळी शोधतीलच, परंतु अन्य काही करता येईल काय यावर विचार मांडत आहे.

सध्याचे युग हे संगणकाचे आहे. मराठे प्रतिष्ठानची वेबसाईटही उपलब्ध आहे असे समजते. बऱ्याच सभासदांकडे नेटची सुविधा असेल तर वेब साईटवर हितगुज प्रकाशित केले तरी बऱ्याच सभासदांपर्यंत ते पोहोचू शकेल. त्या दृष्टीने संगणकतज्ज्ञ मंडळींच्या सहकार्याने आपण हे करू शकतो. (मी संगणक तज्ज्ञ नसलो तरी तज्ज्ञ मंडळींना या कामी गरज पडल्यास मदत करू शकतो.) मासिक-त्रैमासिक सोयीप्रमाणे याचे संपादन होऊ शकते. यामुळे तरुण पिढीला सहजपणे हितगुज उपलब्ध होऊ शकेल. तसेच खर्चातही मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकेल.

अर्थातच छापील अंकाची गोष्टच वेगळी आहे. त्याचे फायदे यांत्रिक अंकाला नसतील. आजपर्यंत या अंकासाठी संपादनापासून वितरणापर्यंत अनेकांनी खूप कष्ट घेतले ते सर्वच अभिनंदनास पात्र आहेत. त्यामुळे इतके सुंदर व नेटके स्वरूप अंकास पात्र झाले. त्यामुळे अंक चालू राहावा हीच इच्छा आहे. दुर्दैवाने पुरेशा प्रतिसादाअभावी छापील अंक बंद करावा लागला तर 'नेट'द्वारा हितगुजचे प्रकाशन या पर्यायाचा विचार होऊ शकतो. अर्थात त्यामुळे कदाचित मर्यादित सदस्यांपर्यंतच तो पोहोचेल, परंतु माहितीची देवाण-घेवाण पूर्णपणे थांबण्यापेक्षा हे बरे.

मी थोडक्यात माझे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कृपया त्यावर आपले विचार/प्रतिक्रिया कळविल्यास आभारी.

एक विनंती सर्व सभासदांची 'एक डिरेक्टरी' - नाव, पत्ता, फोननंबर, ई-मेल चे संकलन करून जमल्यास सभासदांपर्यंत (अर्थात ई-मेलवरूनच) ते पोहोचल्यास सभासदांसाठी ते सोयीचे होईल.

धन्यवाद आणि आभार

**- श्रीनिवास चिंतामण मराठे, पुणे** फोन : क०२०-२५४६४७०६

# आनंद

जीवनात कोठेच सुख नाही, आहे ते केवळ दु:ख या नकारात्मक भूमिकेतून जीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलायला हवी. मनाला सुख, समाधान,शांती देणारे अनंत क्षण जीवनात डोकावतात. जीवनातला हा आनंद निसर्गाच्या सान्निध्यात पशुपक्ष्यांच्या सहवासात, धर्मग्रंथांच्या दुर्लभ संगतीत, एखाद्या अप्रतिम शिल्पकलाकृतीत, संगीताच्या गांधर्वनगरीत किंवा लौकिक जीवनातील साध्यासुध्या घटनांमधूनही आपण आनंदाची अनुभूती घेऊ शकतो आणि सांसारिक जीवनातही स्वर्ग निर्माण करू शकतो.

शत्रू असो की मित्र, जेव्हा आपण त्यांच्याशी सद्भावाने, शांतीने, प्रेमाने व्यवहार करू लागतो त्या वेळेस ती व्यक्ती आपल्याकडे वेगळ्या भावनेने बघू लागते. हा आनंद आपल्या अंत:करणातील सत्त्वगुणांची उंची वाढवितो. अहंतेने शिर उंचावण्यापेक्षा लीनतेने शीर झुकविण्यात खरा आनंद आहे. द्रेषभावातील आनंदात पतनाची बीजे आहेत तर प्रेमभावनेतील आनंदात उत्कर्षाची क्षितीजे आहेत. भोगातील आनंद क्षणिक आहे तर त्यागातील आनंद अक्षय आहे. दुसऱ्याचे हृदय तोडणारी वाणी उच्चारण्यापेक्षा हृदये सांधणारी वाणी जर आपण  बोललो तर ती ईश्वराला प्रिय होईल, साऱ्या जगाला म्हणूनच शब्दांना प्रेमाची किनार हवी, स्नेहाची ऊब हवी, सद्भावाचा ओलावा हाव, कारुण्याचा स्पर्श हवा, शब्दात मार्दव हवे, जिव्हाळा हवा, आत्मीयता हवी. जेव्हा 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' अशा वृत्तीचा हळुवारपणा अंगी बाणेल, दीनदु:खितांच्या सेवेत देवत्वाचा साक्षात्कार होईलत  तेव्हा जीवनात आनंदाचे तरंग निर्माण होतील.

- प्रेषक **चित्रकार राजा मराठे**

१४, उद्यम, उद्यमकुंज सोसायटी, राणी सती मार्ग, मालाड (पू.) मुंबई ४०० ०९७

दूरध्वनी : ०२२-२८७७८६३९



Marathe Pratishthan



## कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे (पृ.५३८)
## यांना भावपूर्ण श्रद्धांजली

जन्म : २६.९.१९४२ निर्वाण : ७.९.२०१२

पती : श्रीपाद नारायण मराठे

: कन्या :

सौ. जयश्री तथा गौरी सदाशिव परांजपे

सौ. वंदना तथा प्रियंका प्रकाश कुलकर्णी

: पत्ता :

५३०/१/१०, बी-२, तारा टेरेसेस, सम्राटनगर, कोल्हापूर

मोबाईल : ९४८०५६६०९१ फोन : ०२३१-२६९३३४१

**कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे (पृ. ५३८) यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन**



Marathe Pratishthan

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप
ऑफ कंपनीज्
बिल्डर अँड डेव्हलपर्स

आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) marathe parivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.maratheprati shthan.org


Marathe Pratishthan